# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. स्थायी समिती सभा दि. ०९/०१/२०१५

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा शुक्रवार दिनांक ९/०१/२०१५ रोजी सभा सुचना क्र. १६ दि. ०५/०१/२०१५ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात सकाळी ११.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती, श्री. प्रशांत एन. केळूसकर हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. प्रशांत एन. केळूसकर | सभापती |
| २. | श्री. परशुराम प. म्हात्रे | सदस्य |
| ३. | डॉ. राजेंद्र जैन | सदस्य |
| ४. | श्री. अश्विन श्यामजी कासोदरीया | सदस्य |
| ५. | सौ. मंदाकिनी गावंड | सदस्या |
| ६. | श्री. हरिश्चंद्र आंमगावकर | सदस्य |
| ७. | श्री. हंसुकुमार कमलकुमार पांडे | सदस्य |
| ८. | सौ. प्रभात प्रकाश पाटील | सदस्या |
| ९. | श्री. सुहास माधवराव रकवी | सदस्य |
| १०. | श्री. स्टिवन जॉन मेंडोन्सा | सदस्य |
| ११. | श्री. नरेश तुकाराम पाटील | सदस्य |
| १२. | श्रीम. नयना म. वसाणी | सदस्या |
| १३. | श्री. मोहन जाधव | सदस्य |
| १४. | श्री. जयंतीलाल पाटील | सदस्य |

**गैरहजर सदस्य –**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. मुन्ना सिंह | सदस्य |

**मा. सभापती**

सर्व सन्मा. सदस्य, अधिकारी वर्ग ह्यांना नववर्षाच्या हार्दिक शुभेच्छा तसेच संक्रातीच्या हार्दिक शुभेच्छा. आजची सभा खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न करु अशी आपल्याकडून अपेक्षा. सचिवांनी सभेच्या कामकाजाला सुरुवात करावी.

**नगरसचिव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा शुक्रवार दि. ०९/०१/२०१५ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. १६, दि. ०५/०१/२०१५ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. प्रकरण क्र. १२८, दि. २१/०८/२०१४, दि. २८/०८/२०१४, दि. ०४/०९/२०१४ व दि. ९/०९/२०१४ रोजीच्या मा. स्थायी समिती सभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**राजेंद्र जैन :-**

पिछली महासभा में आपने आश्वासन दिया था की, अगले बार सब टॅब पे आएगा। वापीस पेपर पे आया है।

**नगरसचिव :-**

बहुत लोगोने ई-मेल आयडी दिया नही। अभी हम ले रहे है।

**राजेंद्र जैन :-**

जिन्होंने दिया उनको मेल भेजो, जिन्होंने नही दिया उनको कागज भेजो।

**नगरसचिव :-**

अभी महासभा में वैसा ही किया है। जिसका ई-मेल नही उसको नही भेजा।

**राजेंद्र जैन :-**

महासभा में पेपर भेजे।

**नगरसचिव :-**

आधे गोषवारे ई-मेल पे भेजे।

**हंसुकुमार पांडे :-**

लेकिन जिसके पास ई-मेल आयडी नहीं है। वह लोग क्या करेंगे?

**राजेंद्र जैन :-**

ई-मेल आयडी क्रिएट करने में कितना टाईम लगता है।

**हंसुकुमार पांडे :-**

क्रिएट करने को टाईम लगता होगा।

**स्टिवन मेंन्डोंसा :-**

मैंने तो सबकुछ बंद किया है।

**राजेंद्र जैन :-**

आप लोगो ने टॅब के लिए वोट किया था।

**नरेश पाटील :-**

हम टॅब सरेन्डर करेंगे। हमे आपका टॅब नही चाहिए।

**राजेंद्र जैन :-**

टॅब खाली इसके लिए नही है। इसके अलावा बहुत सारे काम है। खांबित साहब ने एक पत्र डाला था। हमने भी एक पत्र डाला था की, अगर कोई लाईट बंद पडे तो उसकी फोटो खिचके उनको भेजेंगे तो पॅनल्टी लगेगी। आप टॅब नही यूज करोगे आपके वॉर्ड के समस्या का फोटो नही भेजेंगे शिकासत की भी बात है।

**हंसुकुमार पांडे :-**

हम लोगोने बहुत सारे फोटो भेजे है। व्हॉट्स अप पे भी फोटो भेजे है। फिर भी काम नहीं होता है।

**राजेंद्र जैन :-**

मिडीया है आप शिकायत कर सकते है।

**हंसुकुमार पांडे :-**

किससे शिकायत करे।

**राजेंद्र जैन :-**

टॅब का यूज खाली इसके लिए नहीं है।

**हंसुकुमार पांडे :-**

आपने कितना विषय लिया वो मिडीया में आया है।

**राजेंद्र जैन :-**

चर्चा का विषय यह है आप बर्नड साहब का भाषण पढो उन्होंने हमे कितना सिखाया था उसमें कई सारी बाते थी। पढो उसके बाद आपको लगता है तो विड्रॉ किजीए।

**हंसुकुमार पांडे :-**

अपने को गोषवारा ऐसा नही आएगा तो क्या फरक पडेगा। खर्चे में कमती होएगा। जहाँ बहुत सारी जगह है जहाँ मनपा पैसा बचा सकती है। आज तक बचाई क्या? उस विषय पे आपने कभी बोला है।

**राजेंद्र जैन :-**

मेरा क्या बोलना है वो आप मुझसे बात मत किजीए। टॅब आपने लिया आपका प्रस्ताव था सचिव साहब टॅब देने के बाद में आपको चाहिए नहीं चाहिए क्या प्रति अपनाऐंगे आप ..............

**नगरसचिव :-**

सभागृह डिसाईड करेंगे मैं कैसे डिसाईड करुंगा।

**राजेंद्र जैन :-**

टॅब देने के समय क्या प्रस्ताव दिया था वो कारण दिया था वो देखके आपको डिसीजन लेना पडेगा।

**सुहास रकवी :-**

सचिव साहेब त्यांचे म्हणणे असे आहे की, ज्यांच्याकडे टॅब आहेत त्यांना मेल पाठवा. ज्यांची रिक्वायरमेंट आहे त्याप्रमाणे करा. असे आमचे म्हणणे आहे.

**नरेश पाटील :-**

हमने आपसे टॅब नहीं मांगा था आप लोगो ने हमको दिया है।

**प्रभात पाटील :-**

टॅब देण्याचा विषय महासभेचा होता. महासभेला घ्यायला लागेल.

**राजेंद्र जैन :-**

निविदा स्टँडिंग में आयी है ना।

**मा. सभापती :-**

विषय महासभा का है तो उधर ही जाएगा। टॅब वापस देने का नहीं देने का, भेजने का नहीं भेजने का यह निर्णय महासभा में होगा। ह्या विषयावर पुन्हा घोळ निर्माण होऊ नये. ह्या विषयाची पूर्ण माहिती आणि हा विषय महासभेपुढे सादर करावा. हा विषय महासभेमध्ये स्पष्टीकरण करुन पूर्ण करुन टाका. ज्यांना जे पाहिजे ते

दोन्ही कॉप्या पूरवाना. हायटेक व्हायची गरज नाही. हार्ड कॉपी द्या नाहीतर मेलवर द्यायचे. हा विषय महासभेमध्ये स्पष्टीकरण करुन पूर्ण करुन टाका.

**नरेश पाटील :-**

साहेब जरी मनपाने टॅब दिला असेल तरी काय फरक पडतो का?

**मा. सभापती :-**

आज जे शिकलेले आहेत ते हायटेक होऊ शकतात. कोणाला आणखी नॉलेज मिळू शकते. ज्यांना हार्ड कॉपी पाहिजे त्यांना ती द्या कोणाला टॅबवर द्या. दोन्ही कॉपी पूरवाना. हायटेक व्हायची गरज काय?

**प्रभात पाटील :-**

टॅब परत घेणे हा एकमेव इलाज नाही आहे.

**राजेंद्र जैन :-**

मॅडम, एक बात हुई थी जो टॅब यूज नही कर पाऐंगे तो क्या करेंगे। तो हमने कहाँ अभी जरा सिखा दो पहले ट्रेनींग दो यह प्रस्ताव आपने ही दिया था। टॅब आने दो ट्रेनिंग हम ले लेंगे यह भी आप लोगों ने डिसकस किया था।

**मा. सभापती :-**

ट्रेनिंगबाबत विषय झालेला. नेहमी-नेहमी हा विषय सभेमध्ये येतो. त्याच्यावर वाद उद्‌भवतात टॅब परत द्यायचा की नाही द्यायचा त्यापेक्षा एकदा तो विषय संपवून टाका.

**सुहास रकवी :-**

ज्यांचे मेल आहेत त्यांना पाठवा.

**नरेश पाटील :-**

ज्यांना हवा आहे त्यांना पाठवा. बाकीच्यांना पेपर पाठवा विषय संपला.

**राजेंद्र जैन :-**

आप बोलते है टॅब दिया तो क्या फरक पडता है। लेकिन यह बात जनता को बहुत बुरी लगती है।

**नरेश पाटील :-**

जनता को बहुत कुछ बुरा लगता है उतना हम लोग कर सकते है क्या?

**राजेंद्र जैन :-**

उसमें यह भी एक बात शामील है की, हम लोग टॅब लेके घर में बैठे है। लेकिन उसका यूज नहीं कर रहे है।

**मा. सभापती :-**

ही गोष्ट योग्य आहे मी मान्य करतो कारण ह्या गोष्टीला टॅब सध्या काहीच उपयोगाला नाही. व्हॉट्स अप आणि गेम ह्या दोन गोष्टीसाठी टॅब उपयोगात येतो. सचिव साहेब ह्या टॅबवर आपल्या मनपाने दिल्यानुसार काहीतरी मनपाचे फोटो पाठवत जा. म्हणजे आम्हाला टॅब हातात वापरता येईल की, मनपाच्या काही गोष्टी येतात ते वाचणे आम्हाला गरजेचे आहे.

**हंसुकुमार पांडे :-**

शहर का पूरा चित्र सबके पास है। ऐसा सदस्य नहीं जिसके पास शहर का चित्र नहीं।

(सभागृहात गोंधळ)

**मा. सभापती :-**

सुधारणा येण्याबाबत.

**हंसुकुमार पांडे :-**

सुधार आता ही नहीं। आजतक क्या सुधार आया बताओ। गोल्डन नेस्ट का स्थिती देखो।

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

दि. २१/०८/२०१४, दि. २८/०८/२०१४, दि. ०४/०९/२०१४ व दि. ९/०९/२०१४ रोजीच्या मा. स्थायी समिती इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्या व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**अश्विन कासोदरिया :-**

माझे अनुमोदन आहे.

**नगरसचिव :-**

२ "के" खाली एक विषय आला आहे. हा विषय घ्यायला सगळ्यांची मान्यता आहे का?

**प्रभात पाटील :-**

विषय काय आहे त्याची माहिती द्या.

**दिपक खांबित :-**

राई येथे ग्रामपंचायत काळापासून एक छोटे मार्केट आहे. ते आपण नविन बांधतो ते स्ट्रक्चरल ऑडिट केले ते धोकादायक आहे. जून जे आहे ते कधीही पडेल ती छोटी इमारत आपल्याला तोडायची आहे.

**नरेश पाटील :-**

मी देखील सुचना मांडतो आमच्या मोर्वा गावात जुने ग्रामपंचायत आहे ते नविन बनवा.

**नगरसचिव :-**

ह्या विषयाला सगळ्यांची मान्यता आहे.

**सुहास रकवी :-**

घ्या.

**नगरसचिव :-**

१३७ नंतर हा विषय घेण्यात येईल.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजूर

**प्रकरण क्र. १२८ :-**

दि. २१/०८/२०१४, दि. २८/०८/२०१४, दि. ०४/०९/२०१४ व दि. ९/०९/२०१४ रोजीच्या मा. स्थायी समिती सभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. १२२ :-**

दि. २१/०८/२०१४, दि. २८/०८/२०१४, दि. ०४/०९/२०१४ व दि. ९/०९/२०१४ रोजीच्या मा. स्थायी समिती इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्या व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. हरिश्चंद्र आमगावकर      अनुमोदक :- श्री. अश्विन कासोदरीया**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १२९, पुर्नविनियोजन प्रस्तावास मंजूरी मिळणेबाबत. (लेखा विभाग)

**नयना वसानी :-**

सदर पुर्नविनियोजनाच्या विषयाबाबत कोणतीही स्पष्ट माहिती सादर करण्यात आलेली नाही. याबाबत सविस्तर माहिती सादर करण्यात यावी व त्यांनतर सदरचा विषय पुढील मा. स्थायी समिती सभेमध्ये फेरसादर करण्यात यावा, असा ठराव मांडत आहे.

**अश्विन कासोदरिया :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजूर.

**प्रकरण क्र. १२९ :-**

पुर्नविनियोजन प्रस्तावास मंजूरी मिळणेबाबत. (लेखा विभाग)

**ठराव क्र. १२३ :-**

सदर पुर्नविनियोजनाच्या विषयाबाबत कोणतीही स्पष्ट माहिती सादर करण्यात आलेली नाही. याबाबत सविस्तर माहिती सादर करण्यात यावी व त्यांनतर सदरचा विषय पुढील मा. स्थायी समिती सभेमध्ये फेरसादर करण्यात यावा, असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्रीम. नयना वसाणी      अनुमोदक :- श्री. अश्विन कासोदरीया**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १३०, पुर्नविनियोजन मंजुरी मिळणेबाबत फेरसादर. (आरोग्य साफसफाई विभाग)

**नयना वसानी :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात एकात्मिक डास नियंत्रण कामा करीता डास नाशके, अळी नाशके, मजुर, स्प्रेपंप, फॉग मशिन इत्यादी खरेदी कामी सन २०१४-१५ या आर्थिक वर्षातील अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकातील एकात्मिक डास नियंत्रण करणे या लेखाशिर्षात रु. दीड कोटी तरतुद करण्यात आली होती. सदरची तरतुद संपुष्टात येत असल्याने दि. २९/१२/२०१४ रोजीच्या मा. स्थायी समितीपुढे पुर्नविनियोजनचा

प्रस्ताव सादर करण्यात आला होता. मात्र सदरच्या प्रस्तावास सदर मा. स्थायी समितीने तीन महिन्याकरीता येणारा रु. १,८१,१२,२५०/- इतका खर्च जास्त असल्याने अमान्य करून ठराव पारीत केला होता.

सध्या हिवाळा ऋतु सुरु असून डास उत्पत्तीसाठी पोषक वातावरण असल्याने डास नियंत्रण करणेसाठी सध्या आरोग्य विभागाकडे असलेला डास नाशक, अळी नाशकाचा साठा संपुष्टात आल्याने औषध फवारणी कामात अडथळा निर्माण होणार आहे. शहरात साथीचे आजार उद्‌भवु नये याकरीता आगामी तीन ते चार महिन्यासाठी तातडीने औषधे खरेदी करणे अत्यावश्यक आहे. सदरची बाब ही नागरीकांच्या आरोग्यास निगडीत असल्याने यापुर्वी रु. १,८१,१२,२५०/- पुर्नविनियोजन करणे कामी दिलेल्या प्रस्तावात कंत्राटी मजुर, स्प्रे पंप, फॉग मशिन, डास/अळी नाशके इत्यादी साहित्यवस्तु खरेदी करणेबाबतचा खर्च समाविष्ट होता.

त्यापैकी पुढील आर्थिक वर्षातील निविदा मंजुर होईपर्यंत सन २०१४-१५ या आर्थिक वर्षातील मंजुर दरातील निविदाकाराकडून डास नाशके, अळी नाशके खरेदी करणेकामी नमुना क्र. १० नियम ३० (३) नुसार रु. ८९,४०,७००/- पुर्नविनियोजन करणेस, हि सभा मंजुरी देत आहे.

**अश्विन कासोदरिया :-**

माझे अनुमोदन आहे.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

मा. सभापती साहेब, आपण ही मंजूरी आपण देतो पण फवारणी बरोबर होत नाही. आमच्या गोल्डन नेस्टमध्ये मी फिरतो पण फवारणी बरोबर होत नाही. मच्छरचे प्रमाण वाढतच चालले आहे. माणूस असा उभा राहीला की मच्छरचा गुच्छा डोक्यावर येतो.

**नरेश पाटील :-**

माझ्या वॉर्डात कधीच फवारणी होत नाही.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मा. सभापतीच्या परवानगीने बोलतो मध्यंतरी डासाचे प्रमाण कमी झाले आणि मलेरिया डेंग्यूचे प्रमाण देखील कमी झालेले आहे.

**नरेश पाटील :-**

डेंग्यू, मलेरिया कमी झाले पण मच्छर आहे तसेच आहे ना. मच्छरावर काही नियंत्रणच नाही.

**हंसुकुमार पांडे :-**

लोक आम्हाला बोलतात साहब आप लोग नगरसेवक हो आपलोग कुछ करो।

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

आपण फॉगींग सुरु करणार होतो. फॉगींगसाठी मोठा प्रस्ताव आणला होता. पण आपण नामंजूर केला. महासभेत चर्चा होते. फॉगींग सुरु करा माणस घ्या. मशीन घ्या स्टँडिगमध्ये विषय गेल्यावर विषय नामंजूर केला.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

साहेब आपल्या जुन्या मशीन असतील ना.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

नाहीत ना. २-३ वर्षापासून फॉगींग बंदच आहे.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

फॉगींग बंद केले मग त्या मशीन कुठे आहेत.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

त्या स्क्रॅबमध्ये आहेत.

**सुहास रकवी :-**

साहेब ह्या विषयावर मला बोलायचे आहे. अंदाजे १ करोड ८१ लाख १२ हजार २५० इतका खर्च जास्त असल्याने त्या वेळच्या स्थायी समितीने पारित केला होता.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

त्यावेळच्या नाही २९ च्या स्थायी सभेत.

**सुहास रकवी :-**

त्यावेळेला मी ॲबसेंट होतो. ह्याच्यामध्ये कंत्राटी मजूर तुम्ही जे स्वच्छता साफसफाईचे मजूर आहेत एक्स्ट्रा घेणार आहेत. ह्याचे वेगळे टेंडर काढणार.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

ह्याचे मूळ टेंडर त्याच्यात काढणार आहेत.

**सुहास रकवी :-**

ऑलरेडी एक्झीस्टींग आहेत त्याच्यात ॲड करुन देणार. स्प्रे, पंप, फॉगींग मशीन ह्याला महासभेने मंजूरी दिल्यानंतर त्याच्यानंतर काय खरेदीच केली नव्हती.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

नाही केली.

**सुहास रकवी :-**

८९ लाख ४० हजार ७०० रु. पुर्नःनियोजन म्हणजे त्याच्यामध्ये ॲक्च्युअली १ करोड ८१ लाख की ८९ लाखाचे आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

८९ लाखाचे.

**सुहास रकवी :-**

त्याच्यात मजूर, फॉगींग मशीन.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

त्याच्यात फक्त न्यू औषध आहेत.

**सुहास रकवी :-**

हे औषधाचे आहे त्याच्यात वगळणार किती.

**प्रभात पाटील :-**

हे सगळे वगळणार हे कस तुम्ही प्रोव्हाईड करणार.

**सुहास रकवी :-**

८९ लाखाचेच पुर्नःनियोजन करणार. रिॲप्रोप्रिएशन करणार आहेत तो प्रश्न नाही आहे. त्याला खरेदी करण्यासाठी मंजूर करण्यासाठी फक्त तीन महिन्याकरिता..........

**राजेंद्र जैन :-**

पानपट्टे साहब मैंने बहुत बार बोला है यह जो डिमांड आती है ना की इतनी अमाऊंट चाहिए। यह डिमांड आपका एस.आय. हर एस.आय का वॉर्ड व्हाईज रिक्वायरमेंट मथंली वाईज की उसके आदमी वॉर्ड में इस तरह से काम करेंगे तो इनसे महिने का परमंथ निकलेगा। वह छ एस आय का सादर होता था की एक एस आय महिने भर में सादर होता था। अभी करेंगे की एस.आय. महिने भर में कितना खर्च करता है। एक वॉर्ड में उसके कितने काम करते है तो टाईमटेबल भी मिल जाता। वह मैंने कई बार बोला है लेकिन अभी तक आया नहीं। आज सब नगरसेवक ............

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानूमते मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. १३०**

पुर्नविनियोजन मंजुरी मिळणेबाबत फेरसादर. (आरोग्य साफसफाई विभाग)

**ठराव क्र. १२४ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात एकात्मिक डास नियंत्रण कामा करीता डास नाशके, अळी नाशके, मजुर, स्प्रेपंप, फॉग मशिन इत्यादी खरेदी कामी सन २०१४-१५ या आर्थिक वर्षातील अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकातील एकात्मिक डास नियंत्रण करणे या लेखाशिर्षात रु. दीड कोटी तरतुद करण्यात आली होती. सदरची तरतुद संपुष्टात येत असल्याने दि. २९/१२/२०१४ रोजीच्या मा. स्थायी समितीपुढे पुर्नविनियोजनचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. मात्र सदरच्या प्रस्तावास सदर मा. स्थायी समितीने तीन महिन्याकरीता येणारा रु. १,८१,१२,२५०/- इतका खर्च जास्त असल्याने अमान्य करून ठराव पारीत केला होता.

सध्या हिवाळा ऋतु सुरु असून डास उत्पत्तीसाठी पोषक वातावरण असल्याने डास नियंत्रण करणेसाठी सध्या आरोग्य विभागाकडे असलेला डास नाशक, अळी नाशकाचा साठा संपुष्टात आल्याने औषध फवारणी कामात अडथळा निर्माण होणार आहे. शहरात साथीचे आजार उद्भवु नये याकरीता आगामी तीन ते चार महिन्यासाठी तातडीने औषधे खरेदी करणे अत्यावश्यक आहे. सदरची बाब ही नागरीकांच्या आरोग्यास निगडीत असल्याने यापुर्वी रु. १,८१,१२,२५०/- पुर्नविनियोजन करणे कामी दिलेल्या प्रस्तावात कंत्राटी मजुर, स्प्रे पंप, फॉग मशिन, डास/अळी नाशके इत्यादी साहित्यवस्तु खरेदी करणेबाबतचा खर्च समाविष्ट होता.

त्यापैकी पुढील आर्थिक वर्षातील निविदा मंजुर होईपर्यंत सन २०१४-१५ या आर्थिक वर्षातील मंजुर दरातील निविदाकाराकडून डास नाशके, अळी नाशके खरेदी करणेकामी नमुना क्र. १० नियम ३० (३) नुसार रु. ८९,४०,७००/- पुर्नविनियोजन करणेस, हि सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्रीम. नयना वसाणी** **अनुमोदक :- श्री. अश्विन कासोदरीया**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १३१, कलम ४१ (अ) अ, जल (प्रदूषण, प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम, १९७४ व कलम १५ पर्यावरण (संरक्षण), कायदा, १९८६ याबरोबर नागरी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम २००० प्रमाणे

निर्देश-भांडवली खर्चामधुन २५ टक्के तरतुद नागरी घनकचरा व्यवस्थापनासाठी व सांडपाणी प्रकल्पासाठी करणेबाबत.

**राजेंद्र जैन :-**

वरील विषयान्वये नागरी घनकचरा व्यवस्थापनासाठी व सांडपाणी प्रकल्प उभारणेकरिता भांडवली खर्चामध्ये २५ टक्के तरतुद महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकात करणेबाबत व तशा आशयाचा मा. महासभेचा ठराव सादर करणेबाबत, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने त्यांचे दि.०६/०६/२०१४ व दि.२६/१२/२०१४ रोजीच्या पत्रान्वये (सोबत प्रत जोडलेली आहे) कळविले असुन त्याअनुषंगाने सांडपाणी व नागरी घनकचरा व्यवस्थापनासाठी खालील सुचना दिलेल्या आहेत.

अ) महानगरपालिकेचे सर्व सांडपाणी एकत्रित करुन, त्यावर योग्य ती परिपुर्ण प्रक्रिया करण्यासाठी सांडपाणी प्रक्रिया संयंत्रणा बसवुन, शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावावी.

ब) जो नागरी घनकचरा आपल्या कार्यक्षेत्रामध्ये निर्माण होतो, त्यासाठी स्वतंत्र वर्गीकरण (जैविक विघटनशील/अविघटनशील (Biodegradable /Non-biodegradable) आणि पुर्ननिर्माण घनकचरा (Recoverable Waste) करुन त्यांची विल्हेवाट सांडपाणी पुरवठा आणि स्वच्छता विभाग, मंत्रालय, महाराष्ट्र शासन यांच्या शासन निर्णय क्र.घकव्य-१००३/प्र.क्र.६७५/पापु-२२, दि.२६/०८/२००३ प्रमाणे योग्य ती भुभरण जागा मान्यता मिळालेल्या ठिकाणी, नागरी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम, २००० मधील तरतुदींप्रमाणे, मे.मुंबई उच्च न्यायालय खंडपीठापुढे दाखल करण्यात आलेल्या सार्वजनिक हिताच्या याचिका क्र.१७४०/१९९८ आणि इतर एकत्रित याचिका मधील दि.०२/०४/२०१३ च्या आदेशाप्रमाणे दिलेल्या विहित मुदतीत करणे आपणांवर बंधनकारक आहे.

क) त्यामुळे आपण परिपुर्ण सांडपाणी व्यवस्थापन व नागरी घनकचरा व्यवस्थापनासाठी प्रत्येक वर्षी एकुण भांडवली खर्चापैकी २५ टक्के तरतुद करुन या प्रकल्पावर खर्च करावे, जेणेकरुन सदरहु यंत्रणा उभारण्यासाठी योग्य ती आर्थिक तरतुद होऊन कायदेशीर पुर्तता पार पाडली जाईल.

मिरा-भाईदर महानगरपालिकेच्या वार्षिक अंदाजपत्रकात सांडपाणी प्रकल्प उभारणेकरीता व नागरी घनकचरा व्यवस्थापनासाठी प्रत्येक वर्षी एकुण भांडवली खर्चापैकी २५ टक्के खर्च हा सादर केलेला असुन आपल्या महानगरपालिकेत मागील २ वर्षापासुन यासाठी स्वातंत्र असे हेड स्थापित केलेले आहेत.

**हरिश्चंद्र आमगावर :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजूर.

**सुहास रकवी :-**

घनकचऱ्याच्या ह्याच्यामध्ये आपण जो व्यवस्थापन सांडपाणी प्रकल्प आता जे एस.पी.एम.एल. ची काम करतात मग तो आणि हा वेगळा आहे का?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

दोन्ही मिळून एकच आहे. जल प्रदुषण आणि घनकचरा व्यवस्थापन या संदर्भातील २५ टक्के भांडवली खर्चाच्या हा ठराव करुन मागवल्या आहे. पोल्यूशन कंट्रोल बोर्डने तसा ठराव करुन देतो. आपण हळूहळू खर्च करतो. ३७ टक्के खर्च करतो. २५ टक्के हाणी स्थिती त्यांना ठराव पाहिजे.

**सुहास रकवी :-**

एस.पी.एम.एल चा सध्या जो चालू आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

त्याच्यापेक्षा जास्त खर्च आहे.

**मा. सभापती :-**

विषय असा आहे की, शासनाकडून आपल्याला पोल्यूशन कंट्रोल बोर्डाकडून आपल्याला निर्देश आले आहेत की भांडवली खर्चातले २५ टक्के आपण त्यांना दाखवायचे. त्यांना ठराव करुन द्यायचा आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

बऱ्याच मनपा करत नाही.

**मा. सभापती :-**

त्या माहितीमध्ये असा विषय आहे की, बऱ्याच मनपानी तो खर्च क्रिएट केला आणि दाखवला. पण आपल्या माहितीप्रमाणे मागील दोन वर्षापासून आपण भांडवली खर्चाना ३७ टक्के खर्च त्यासाठी राखीव ठेवतो.

**सुहास रकवी :-**

ह्याच्यात सांडपाणी प्रकल्पासाठी करणेबाबत त्यामुळे हा उल्लेख आला तो एस.पी.एम.एल. ला ऑलरेडी दिला आहे.

**मा. सभापती :-**

आपल्याला शासनमान्य आहे तर मग करायचा आहे असा तो विषय आहे. आपण करतोच ना मग स्वतंत्र हेड कशाला करायचा.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

हेड वेगळा करा असे मी म्हणत नाही. त्यामुळे स्वतंत्र हेड असल्याने दुसऱ्यांदा हेड स्थापन करायची गरज नाही अशा वाक्याची गरज नाही.

**मा. सभापती :-**

स्वतंत्र हेड आहे ना पण दुसऱ्यांदा पुनहा कशाला हेड हवा आहे तुम्हाला.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

खर्च करा म्हणतो.

**मा. सभापती :-**

खर्च आम्ही दिला ना. खर्च करतो.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

हे वाक्य टाकायची तुम्हाला गरज नाही.

**सुहास रकवी :-**

पानपट्टे साहेब तुम्ही तो ठराव वाचला का? त्याच्यामध्ये हेड वेगळा करण्याकरिता होता.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

नाही तो खर्च संदर्भासाठी होता.

**सुहास रकवी :-**

हेडचे काय म्हणतात बघा.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

त्यांनी वेगवेगळे वर्डींग टाकले आहे.

**सुहास रकवी :-**

वर्डींग चेंज करुन घ्या.

**मा. सभापती :-**

तुमच्या हातानी करुन घ्या. ठराव सर्वानुमते मंजूर.

**प्रकरण क्र. १३१ :-**

कलम ४१ (अ) अ, जल (प्रदूषण, प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम, १९७४ व कलम १५ पर्यावरण (संरक्षण), कायदा, १९८६ याबरोबर नागरी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम २००० प्रमाणे निर्देश- भांडवली खर्चामधुन २५ टक्के तरतुद नागरी घनकचरा व्यवस्थापनासाठी व सांडपाणी प्रकल्पासाठी करणेबाबत.

**ठराव क्र. १२५ :-**

वरील विषयान्वये नागरी घनकचरा व्यवस्थापनासाठी व सांडपाणी प्रकल्प उभारणेकरिता भांडवली खर्चामध्ये २५ टक्के तरतुद महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकात करणेबाबत व तशा आशयाचा मा. महासभेचा ठराव सादर करणेबाबत, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने त्यांचे दि.०६/०६/२०१४ व दि.२६/१२/२०१४ रोजीच्या पत्रान्वये (सोबत प्रत जोडलेली आहे) कळविले असुन त्याअनुषंगाने सांडपाणी व नागरी घनकचरा व्यवस्थापनासाठी खालील सुचना दिलेल्या आहेत.

अ) महानगरपालिकेचे सर्व सांडपाणी एकत्रित करुन, त्यावर योग्य ती परिपुर्ण प्रक्रिया करण्यासाठी सांडपाणी प्रक्रिया संयंत्रणा बसवुन, शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावावी.

ब) जो नागरी घनकचरा आपल्या कार्यक्षेत्रामध्ये निर्माण होतो, त्यासाठी स्वतंत्र वर्गीकरण (जैविक विघटनशील/अविघटनशील (Biodegradable /Non-biodegradable) आणि पुर्ननिर्माण घनकचरा (Recoverable Waste) करुन त्यांची विल्हेवाट सांडपाणी पुरवठा आणि स्वच्छता विभाग, मंत्रालय, महाराष्ट्र शासन यांच्या शासन निर्णय क्र.घकव्य-१००३/प्र.क्र.६७५/पापु-२२, दि.२६/०८/२००३ प्रमाणे योग्य ती भुभरण जागा मान्यता मिळालेल्या ठिकाणी, नागरी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम, २००० मधील तरतुदींप्रमाणे, मे.मुंबई उच्च न्यायालय खंडपीठापुढे दाखल करण्यात आलेल्या सार्वजनिक हिताच्या याचिका क्र.१७४०/१९९८ आणि इतर एकत्रित याचिका मधील दि.०२/०४/२०१३ च्या आदेशाप्रमाणे दिलेल्या विहित मुदतीत करणे आपणांवर बंधनकारक आहे.

क) त्यामुळे आपण परिपुर्ण सांडपाणी व्यवस्थापन व नागरी घनकचरा व्यवस्थापनासाठी प्रत्येक वर्षी एकुण भांडवली खर्चापैकी २५ टक्के तरतुद करुन या प्रकल्पावर खर्च करावे, जेणेकरुन सदरहु यंत्रणा उभारण्यासाठी योग्य ती आर्थिक तरतुद होऊन कायदेशीर पुर्तता पार पाडली जाईल.

मिरा-भाईदर महानगरपालिकेच्या वार्षिक अंदाजपत्रकात सांडपाणी प्रकल्प उभारणेकरीता व नागरी घनकचरा व्यवस्थापनासाठी प्रत्येक वर्षी एकुण भांडवली खर्चापैकी २५ टक्के खर्च हा सादर केलेला असुन आपल्या महानगरपालिकेत मागील २ वर्षापासुन यासाठी स्वातंत्र असे हेड स्थापित केलेले आहेत.

**सुचक :- डॉ. राजेंद्र जैन अनुमोदक :- श्री. हरिश्चंद्र आमगावकर**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १३२, महापालिका आस्थापनेवर ठोक मानधनावर तात्पुरत्या स्वरुपात लघुलेखक भरणेबाबत.

**जयंतीलाल पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका महासभा, स्थायी समिती सभा व अन्य समित्यांचे इतिवृत्ते तयार करणेकामी आवश्यकता असल्याने वृत्तपत्रात प्रसिध्दी देऊन, ४ लघुलेखक यांची ठोक मानधनावर नेमणूक केलेली होती. सदर नेमणूकीस स्थायी समिती दि.०४/०३/२००७ ठराव क्र.२०१ ने मंजूरी दिलेली होती. सद्यस्थितीत एकुण ४ लघुलेखकापैकी ३ लघुलेखक अन्यत्र नोकरी सोडून गेले आहेत.

महानगरपालिका सचिव कार्यालयाकरीता महासभा, स्थायी समिती, परिवहन समिती, इतर विशेष समित्यांचे आयोजन याकामी सभेचे इतिवृत्त लिहिणे तसेच प्रशासनाकडील विविध प्रकरणावरील सुनावणी, आढावा बैठकी यांसाठी लघुलेखकांची आवश्यकता आहे. सद्यस्थितीत नगरसचिव विभागात १ लघुलेखक कार्यरत असुन, लघुलेखकावर कामाचा ताण पडत आहे. महासभा दि.१९/०७/२०१४ ठराव क्र.१५ नुसार लघुलेखकास ठोकमानधन रु.१२,५००/- मंजुर करण्यात आलेले आहे. कामाची निकड, आवश्यकता इत्यादी बाबी विचारात घेता ४ लघुलेखक महानगरपालिका कर्मचारी सेवा (सेवा भरती व सेवांचे वर्गीकरण) नियम-२०१४ शैक्षणिक अर्हता/पात्रता अनुभव मधील तरतुदीनुसार ठोक मानधनावर नियुक्त करणे आवश्यक असुन, त्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ नुसार (सहा महिन्यांकरीता) नियुक्त करणेस मंजूरी देण्यात येत आहे असा ठराव मांडत आहे.

**अश्विन कासोदरिया :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजूर.

**प्रकरण क्र. १३२ :-**

महापालिका आस्थापनेवर ठोक मानधनावर तात्पुरत्या स्वरुपात लघुलेखक भरणेबाबत.

**ठराव क्र. १२६ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका महासभा, स्थायी समिती सभा व अन्य समित्यांचे इतिवृत्ते तयार करणेकामी आवश्यकता असल्याने वृत्तपत्रात प्रसिध्दी देऊन, ४ लघुलेखक यांची ठोक मानधनावर नेमणूक केलेली होती. सदर नेमणूकीस स्थायी समिती दि.०४/०३/२००७ ठराव क्र.२०१ ने मंजूरी दिलेली होती. सद्यस्थितीत एकुण ४ लघुलेखकापैकी ३ लघुलेखक अन्यत्र नोकरी सोडून गेले आहेत.

महानगरपालिका सचिव कार्यालयाकरीता महासभा, स्थायी समिती, परिवहन समिती, इतर विशेष समित्यांचे आयोजन याकामी सभेचे इतिवृत्त लिहिणे तसेच प्रशासनाकडील विविध प्रकरणावरील सुनावणी, आढावा बैठकी यांसाठी लघुलेखकांची आवश्यकता आहे. सद्यस्थितीत नगरसचिव विभागात १ लघुलेखक कार्यरत असुन, लघुलेखकावर कामाचा ताण पडत आहे. महासभा दि.१९/०७/२०१४ ठराव क्र.१५ नुसार लघुलेखकास ठोकमानधन रु.१२,५००/- मंजुर करण्यात आलेले आहे. कामाची निकड, आवश्यकता इत्यादी बाबी विचारात घेता ४ लघुलेखक महानगरपालिका कर्मचारी सेवा (सेवा भरती व सेवांचे वर्गीकरण) नियम-२०१४ शैक्षणिक अर्हता/पात्रता अनुभव मधील तरतुदीनुसार ठोक मानधनावर नियुक्त करणे आवश्यक असुन, त्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ नुसार (सहा महिन्यांकरीता) नियुक्त करणेस मंजूरी देण्यात येत आहे असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. जयंतीलाल पाटील अनुमोदक :- श्री. अश्विन कासोदरीया**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १३३, मा. स्थायी समिती सभा दि. २९/१२/२०१४, प्रकरण क्र. १२१ मधील प्रकरण फेरसादर करणे.

**हंसुकुमार पांडे :-**

प्रकरण क्र. १३३ में एरिया का उल्लेख नहीं किया है। स्मशान भूमी में ५० लाख का क्या बनानेवाला है उसका उल्लेख नहीं है। आपका गोषवारा इनकम्पलीट है। गोषवारा कम्पलीट दिया करो। आप स्थायी समिती की दिशाभूल करते हो।

**सुहास रकवी :-**

फेरनिविदा कशाकरिता.

**नयना वसानी :-**

एकाच कंपनीला ....................

**सुहास रकवी :-**

ह्याच्यात दोन कंपन्या आहेत.

**नयना वसानी :-**

वरील विषयानुसार मा. स्थायी समिती सभा दि. २९/१२/२०१४ प्रकरण क्र. १२१ अन्वये निविदांना मान्यता देणेसाठी सादर केलेल्या प्रस्तावात खालील कामांचा समावेश होता.

| अ क्र. | टेंडर आय.डी | कामाचे नांव / ठेकेदाराचे नांव | अंदाजित खर्च / ठेकेदाराने सादर केलेले दर | मा.आयुक्त यांची प्रशासकीय/ आर्थिक मान्यता दिनांक | वृत्तपत्राचे नाव व प्रसिध्दी दिनांक | मा. निविदा समिती बैठकीची शिफारस | ई-टेंडरींग निविदा प्रसिध्दी दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | २२२३३ | **भाईंदर (प.) प्रभाग क्र. २७ मधील स्मशानभुमी विकसीत करणे. (दलित वस्ती अनुदान) (दोन मुदतवाढी)**<br><br>**१.मे. ऐश्वर्या इंटरप्रायझेस** | **रु. ४९,४०,४००/-**<br><br>१.३३% कमी दराने<br>**दरवाटाघाटीनंतर ४.००% कमी दराने** | दि. १७/०६/२०१४ | दै. फ्रि प्रेस जर्नल/ दै. धावते नवनगर<br>दि. १०/०८/२०१४ | दि. २६/११/२०१४ | दि.११/०८/२०१४ |
| २ | २२२८० | **उत्तन घनकचरा प्रकल्प पायथ्याशी कुंपणभिंत बांधणे.**<br>**(फेर निविदा) (दोन मुदतवाढी)**<br><br>**१.मे. आर ॲण्ड बी इंन्फ्रा प्रोजेक्टस प्रा.लि.**<br><br>२.मे. देव इंजिनिअर्स | **रु.४,३२,२२,७८०/-**<br><br>७.३% कमी दराने<br>**दरवाटाघाटीनंतर ८.००% कमी दराने**<br><br>२१.००% जास्त दराने | दि. ०७/०७/२०१४ | दै. लोकसत्ता/ दै. फ्रि प्रेस जर्नल<br>दि. २२/०८/२०१४ | दि. २६/११/२०१४ | दि.२५/०८/२०१४ |
| ३ | २२२९६ | **मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती क्र. १ मधील फुटपाथ/नाले/गटारे यावरील साफसफाई करीता आर.सी.सी झाकणे बसविणे** | - | | दै.फ्रि प्रेस जर्नल/ दै. ठाणे की आवाज<br>दि. १२/०७/२०१४ | दि. १६/१२/२०१४ | दि. २८/०८/२०१४ |
| | SR NO. | DESCRIPTION | | PER | **NARESH CONSTRUCTION** | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | **B – 2 RATE QUOTE BY CONTRACTOR** | | |
| | | ITEM NO. 1<br>Providing and Fixing in position precast RCC Cover on Gutter/ Footpath/ Nalla of 75 mm thick M 30 Grade with main & distribution steel 12 mm fro @100 mm c/c with covering of 0.90 mm thick G.I. plate by providing sufficient hook for lifting (with all leads) as per drawing attached and as per instruction given by site in charge.<br>(0.60M x 0.60M, 0.75M x 0.75M, 0.60M x 0.75M, 0.75M x 0.90M, 0.90M x 0.90 M, 1.2 M x 1.20 M etc. )<br>RCC Concrete Cover (for pedestrian Use) | | SMT | **1305/-** | | |
| | | ITEM NO. 2<br>Providing and Fixing in position precast RCC Cover on main road of 100 mm thick M 30 Grade with main & distribution steel 16 mm fro @100 mm c/c with covering of 0.90 mm thick G.I. plate by providing sufficient hook for lifting (with all leads) as per drawing attached and as per instruction given by site in charge.<br>Mainly Sizes as follows.<br>(0.60M x 0.60M, 0.75M x 0.75M, 0.60M x 0.75M, 0.75M x 0.90M, 0.90M x 0.90 M, 1.2 M x 1.20 M etc. )<br>RCC Concrete Cover (for Main Road Use) | | SMT | **2232/-** | | |
| ४ | २२२९७ | **मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती क्र. २ मधील फुटपाथ/नाले/गटारे यावरील साफसफाई करीता आर.सी.सी झाकणे बसविणे** | - | | दै.फ्रि प्रेस जर्नल/ दै. ठाणे की आवाज<br>दि. १२/०७/२०१४ | दि. १६/१२/२०१४ | दि. २८/०८/२०१४ |
| | SR NO. | DESCRIPTION | | PER | **NARESH CONSTRUCTION** | | |
| | | | | | **B – 2 RATE QUOTE BY CONTRACTOR** | | |
| | | ITEM NO. 1<br>Providing and Fixing in position precast RCC Cover on Gutter/ Footpath/ Nalla of 75 mm thick M 30 Grade with main & distribution steel 12 mm fro @100 mm c/c with covering of 0.90 mm thick G.I. plate by providing sufficient hook for lifting (with all leads) as per drawing attached and as per instruction given by site in charge. | | SMT | **1305/-** | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | (0.60M x 0.60M, 0.75M x 0.75M, 0.60M x 0.75M, 0.75M x 0.90M, 0.90M x 0.90 M, 1.2 M x 1.20 M etc. )<br>RCC Concrete Cover (for pedestrian Use) | | | | | |
| | | ITEM NO. 2<br>Providing and Fixing in position precast RCC Cover on main road of 100 mm thick M 30 Grade with main & distribution steel 16 mm fro @100 mm c/c with covering of 0.90 mm thick G.I. plate by providing sufficient hook for lifting (with all leads) as per drawing attached and as per instruction given by site in charge.<br>Mainly Sizes as follows.<br>(0.60M x 0.60M, 0.75M x 0.75M, 0.60M x 0.75M, 0.75M x 0.90M, 0.90M x 0.90 M, 1.2 M x 1.20 M etc. )<br>RCC Concrete Cover (for Main Road Use) | | SMT | **2232/-** | | |
| ५ | २२२९८ | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती क्र. ३ मधील फुटपाथ/नाले/गटारे यावरील साफसफाई करीता आर.सी.सी झाकणे बसविणे | - | | दै.फ्रि प्रेस जर्नल/ दै. ठाणे की आवाज दि. १२/०७/२०१४ | दि. १६/१२/२०१४ | दि. २८/०८/२०१४ |
| | SR NO. | DESCRIPTION | | PER | **NARESH CONSTRUCTION** | | |
| | | | | | **B – 2 RATE QUOTE BY CONTRACTOR** | | |
| | | ITEM NO. 1<br>Providing and Fixing in position precast RCC Cover on Gutter/ Footpath/ Nalla of 75 mm thick M 30 Grade with main & distribution steel 12 mm fro @100 mm c/c with covering of 0.90 mm thick G.I. plate by providing sufficient hook for lifting (with all leads) as per drawing attached and as per instruction given by site in charge.<br>(0.60M x 0.60M, 0.75M x 0.75M, 0.60M x 0.75M, 0.75M x 0.90M, 0.90M x 0.90 M, 1.2 M x 1.20 M etc. )<br>RCC Concrete Cover (for pedestrian Use) | | SMT | **1305/-** | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ITEM NO. 2<br>Providing and Fixing in position precast RCC Cover on main road of 100 mm thick M 30 Grade with main & distribution steel 16 mm fro @100 mm c/c with covering of 0.90 mm thick G.I. plate by providing sufficient hook for lifting (with all leads) as per drawing attached and as per instruction given by site in charge.<br>Mainly Sizes as follows.<br>(0.60M x 0.60M, 0.75M x 0.75M, 0.60M x 0.75M, 0.75M x 0.90M, 0.90M x 0.90 M, 1.2 M x 1.20 M etc. )<br>RCC Concrete Cover (for Main Road Use) | | SMT | **2232/-** | | |
| ६ | २२२९९ | **मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती क्र. ४ मधील फुटपाथ/नाले/गटारे यावरील साफसफाई करीता आर.सी.सी झाकणे बसविणे** | - | | दै.फ्रि प्रेस जर्नल/ दै. ठाणे की आवाज दि. १२/०७/२०१४ | दि. १६/१२/२०१४ | दि. २८/०८/२०१४ |
| | SR NO. | DESCRIPTION | | PER | **NARESH CONSTRUCTION** | | |
| | | | | | **B – 2 RATE QUOTE BY CONTRACTOR** | | |
| | | ITEM NO. 1<br>Providing and Fixing in position precast RCC Cover on Gutter/ Footpath/ Nalla of 75 mm thick M 30 Grade with main & distribution steel 12 mm fro @100 mm c/c with covering of 0.90 mm thick G.I. plate by providing sufficient hook for lifting (with all leads) as per drawing attached and as per instruction given by site in charge.<br>(0.60M x 0.60M, 0.75M x 0.75M, 0.60M x 0.75M, 0.75M x 0.90M, 0.90M x 0.90 M, 1.2 M x 1.20 M etc. )<br>RCC Concrete Cover (for pedestrian Use) | | SMT | **1305/-** | | |
| | | ITEM NO. 2<br>Providing and Fixing in position precast RCC Cover on main road of 100 mm thick M 30 Grade with main & distribution steel 16 mm fro @100 mm c/c with covering of 0.90 mm thick G.I. plate by providing sufficient hook for lifting (with all leads) as per drawing attached and as per instruction given by site in charge.<br>Mainly Sizes as follows.<br>(0.60M x 0.60M, 0.75M x 0.75M, 0.60M x 0.75M, 0.75M x 0.90M, 0.90M x 0.90 M, 1.2 M x 1.20 M etc. ) | | SMT | **2232/-** | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | RCC Concrete Cover (for Main Road Use) | | | | | |
| ७ | २२३०० | **मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती क्र. ५ मधील फुटपाथ/नाले/गटारे यावरील साफसफाई करीता आर.सी.सी झाकणे बसविणे** | - | | दै.फ्रि प्रेस जर्नल/ दै. ठाणे की आवाज दि. १२/०७/२०१४ | दि. १६/१२/२०१४ | दि. २८/०८/२०१४ |
| | SR NO. | DESCRIPTION | | PER | **NARESH CONSTRUCTION** | | |
| | | | | | **B – 2 RATE QUOTE BY CONTRACTOR** | | |
| | | ITEM NO. 1<br>Providing and Fixing in position precast RCC Cover on Gutter/ Footpath/ Nalla of 75 mm thick M 30 Grade with main & distribution steel 12 mm fro @100 mm c/c with covering of 0.90 mm thick G.I. plate by providing sufficient hook for lifting (with all leads) as per drawing attached and as per instruction given by site in charge.<br>(0.60M x 0.60M, 0.75M x 0.75M, 0.60M x 0.75M, 0.75M x 0.90M, 0.90M x 0.90 M, 1.2 M x 1.20 M etc. )<br>RCC Concrete Cover (for pedestrian Use) | | SMT | **1305/-** | | |
| | | ITEM NO. 2<br>Providing and Fixing in position precast RCC Cover on main road of 100 mm thick M 30 Grade with main & distribution steel 16 mm fro @100 mm c/c with covering of 0.90 mm thick G.I. plate by providing sufficient hook for lifting (with all leads) as per drawing attached and as per instruction given by site in charge.<br>Mainly Sizes as follows.<br>(0.60M x 0.60M, 0.75M x 0.75M, 0.60M x 0.75M, 0.75M x 0.90M, 0.90M x 0.90 M, 1.2 M x 1.20 M etc. )<br>RCC Concrete Cover (for Main Road Use) | | SMT | **2232/-** | | |
| ८ | २२३०१ | **मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती क्र. ६ मधील फुटपाथ/नाले/गटारे यावरील साफसफाई करीता आर.सी.सी झाकणे बसविणे** | - | | दै.फ्रि प्रेस जर्नल/ दै. ठाणे की आवाज दि. १२/०७/२०१४ | दि. १६/१२/२०१४ | दि. २८/०८/२०१४ |

| | SR NO. | DESCRIPTION | PER | **NARESH CONSTRUCTION** |
|---|---|---|---|---|
| | | | | **B – 2 RATE QUOTE BY CONTRACTOR** |
| | | ITEM NO. 1<br>Providing and Fixing in position precast RCC Cover on Gutter/ Footpath/ Nalla of 75 mm thick M 30 Grade with main & distribution steel 12 mm fro @100 mm c/c with covering of 0.90 mm thick G.I. plate by providing sufficient hook for lifting (with all leads) as per drawing attached and as per instruction given by site in charge.<br>(0.60M x 0.60M, 0.75M x 0.75M, 0.60M x 0.75M, 0.75M x 0.90M, 0.90M x 0.90 M, 1.2 M x 1.20 M etc. )<br>RCC Concrete Cover (for pedestrian Use) | SMT | **1305/-** |
| | | ITEM NO. 2<br>Providing and Fixing in position precast RCC Cover on main road of 100 mm thick M 30 Grade with main & distribution steel 16 mm fro @100 mm c/c with covering of 0.90 mm thick G.I. plate by providing sufficient hook for lifting (with all leads) as per drawing attached and as per instruction given by site in charge.<br>Mainly Sizes as follows.<br>(0.60M x 0.60M, 0.75M x 0.75M, 0.60M x 0.75M, 0.75M x 0.90M, 0.90M x 0.90 M, 1.2 M x 1.20 M etc. )<br>RCC Concrete Cover (for Main Road Use) | SMT | **2232/-** |

वरील पैकी अ.क्र. १ व २ यासाठी दि. २९/१२/२०१४ रोजी झालेल्या स्थायी समिती सभेत प्रकरण क्र. १२१ व ठराव क्र. ११६ या निविदांना मान्यता देणेबाबत सदर दोन्ही कामांच्या फेर निविदा मागविण्यात याव्यात, असा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला होता. तरीसुध्दा सदर अ.क्र. १ व २ या निविदांच्या मंजूरीबाबत आजच्या सभेत विषय फेरसादर करण्यात आलेले आहेत. तरी अ.क्र. १ कामाची फेरनिविदा मागविल्यास अजून कमी दराने मनपाच्या आर्थिक फायद्याच्या दृष्टीने महत्वाचे ठरते. म्हणून सदर अ.क्र. १ ची निविदा रद्द करुन अ.क्र. १ ची फेरनिविदा मागविण्यात यावी. अ.क्र. २ घनकचरा प्रकल्प मिरा भाईंदर महानगरपालिकेत सुरु नाही. तसेच भविष्यात आपण घनकचरा प्रकल्प सकवार येथे स्थलांतरीत करीत आहोत. म्हणून पाटील कुंपणभिंत बांधण्यात काही अर्थ दिसत नाही. तसेच जर जागा सुरक्षित करण्याच्या हेतूने कुंपणभिंत बांधणे असल्यास संपूर्ण क्षेत्रात भिंत बांधण्यासाठी नव्याने निविदा मागविणेसाठी अ.क्र. २ ची मागविलेली निविदा रद्द करण्यात येते. अ.क्र. ३ नुसार प्रभाग समिती १ करीता रु. ५ लाख वापरण्यात यावे. अ.क्र. ४ नुसार प्रभाग समिती क्र. २ करीता रु. ६ लाख वापरण्यात यावेत. अ.क्र. ५ नुसार प्रभाग समिती क्र. ३ करीता रु. ६ लाख वापरण्यात यावेत. अ.क्र. ६ नुसार प्रभाग समिती क्र. ४ करीता रु. ६ लाख वापरण्यात यावेत. अ.क्र. ७ नुसार प्रभाग समिती क्र. ५ करीता ही सभा रु. ७ लाख वापरण्यात यावेत. अ.क्र. ८ नुसार प्रभाग समिती क्र. ६ करीता रु. २० लाख एवढी रक्कम वापरण्यात यावी. वरील नुसार ठराव मांडण्यात येत आहे. झाकणांच्या प्रभाग क्र. १ ते ६ साठी मंजूर केलेली तरतूद संपल्यास जादा खर्चासाठी सदर मंजूर दराने पुन्हा स्थायी समिती सभेपुढे विषय ठेवावा व जो पर्यंत बिलो निविदा येत नाही. फेरनिविदा मागवत रहावे.

**प्रभात पाटील :-**

प्रभाग ०६ करिता २० लाख का?

**सुहास रकवी :-**

ही जी टेंडर काढतात खांबित साहेब तुम्हीच उत्तर द्या. ह्यांनी सांगितले सकवार येथे प्रोजेक्ट जाणार आहे. तुमची सगळी मान्यता आली आहे. घनकचरा तिथे शिफ्ट झालेला आहे. पैशाची देवाणघेवाण झाली नाही म्हणून टेंडर रि-कॉल करायची आहे. सकवार इथे कोणी हे केले आहे.

(सभागृहात गोंधळ)

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य आपला शब्द मागे घ्या. पैशाच्या देवाणघेवाणीचा विषय कुठे आला. पैशाच्या देवाणघेवाणीचा विषय कसा आला ते मला स्पष्ट करुन दाखवा.

**सुहास रकवी :-**

मी सिध्द करुन दाखवतो ना. विषय असा आहे सकवारचा प्रोजेक्ट आहे. सकवारच्या प्रोजेक्टची तुमच्या हातात कागद नाहीत की काय नाही. ह्यांनी कसे सांगितले की सकवार येथे प्रोजेक्ट शिफ्ट करण्यात येत आहे.

**मा. सभापती :-**

ह्याच्यात पैशाचा विषय कुठे आहे.

**सुहास रकवी :-**

पैशाचा विषय नाही आहे.

**नयना वसानी :-**

तुम्ही बोलतात पैशाची देवाणघेवाण झाली ह्याच्यात पैशाचा विषय आला कसा. मला सिध्द करुन दाखवा.

(सभागृहात गोंधळ)

**सुहास रकवी :-**

यही टेंडर के बारे में स्मशान भूमी का जो काम है वह इर्म्पोटंट है नहीं।

**राजेंद्र जैन :-**

नंबर ३,४,५,६,७,८ नंबर देखो। लास्ट टेंडर ३६०० का इस बार १३०० रु. का आप के टेंडर से १.३ टक्के लो है। हम नगरपालिका का फायदा कर रहे है। मुद्दे की बात यह है आप ढक्कन का कव्हर देखो हम वही चाहते है। आपका टेंडर १.३ टक्का लो है। हम चाहते है वो २० टक्का लो आ रहा है।

**सुहास रकवी :-**

दर वाटाघाटीनंतर ४ टक्के बिलो असे दिले आहे.

(सभागृहात गोंधळ)

**सुहास रकवी :-**

विषय काय आहे. भाईंदर पश्चिमेला स्मशानभुमी एकच आहे. त्याची दुरुस्ती आम्ही कित्येक महिने मागणी करतो. त्याच्यानंतर टेंडर काढण्यात दिरंगाई काम करण्यात दिरंगाई जी गोष्ट आवश्यक आहे ती केलीच पाहिजे.

**राजेंद्र जैन :-**

२-३ बार रि-कॉल होने के बाद और निचे आएगा।

**सुहास रकवी :-**

जो काम करने का वो साल के अंदर नही करने का।

**राजेंद्र जैन :-**

रि-कॉल करके और रेट निचे आया है।

**सुहास रकवी :-**

दोन मुदतवाढ दिल्यानंतर ती रि-कॉल झाली आहे.

**राजेंद्र जैन :-**

ढक्कन का २६०० रु. किधर और १३०० किधर आप बात को समझिए।

**सुहास रकवी :-**

स्मशानभुमी करणे गरजेचे आहे. स्मशान भुमीची आम्ही एक वर्षापासून मागणी करतो.

**मा. सभापती :-**

विषय तो नाही पहिला तुम्ही तुमचा शब्द मागे घ्या.

**सुहास रकवी :-**

शब्द मागे घेतला असला तरी एक लक्षात ठेवा.

**मा. सभापती :-**

घेतला नाही तुम्ही घ्या.

**सुहास रकवी :-**

शब्द मागे घेऊन सभापती साहेब तुम्हाला सांगतो ही गरज आहे आणि हे जर तुम्ही केले नाही कारण आमच्याकडे एकच स्मशानभूमी आहे त्याचा विचार करुन त्याला मान्यता द्यावी ही विनंती करतो.

**नयना वसानी :-**

मा. सभापती महोदय ह्याच्या पुढच्या सभेला आपण सगळ्या सदस्यांना सांगा की कोणी कसे पर्सनल आक्षेप करु नये.

**सुहास रकवी :-**

मी तुमच्यावर वैयक्तिक आरोप केलाच नाही.

(सभागृहात गोंधळ)

**मा. सभापती :-**

ह्यापुढे असे अपशब्द वापरण्याची प्रथा बंद करा. कारण त्याच्याने काही साध्य होणार नाही. आपआपसात वाद निर्माण होतील. आपण सुरुवात करतानाच सांगतो की खेळीमेळीच्या वातावरणात करायची आहे. पैशाची देवाणघेवाण हा शब्द जर बाहेर गेला तर त्याच्यानी जनतेवर खूप मोठा फरक पडणार आहे. त्यामुळे अशा शब्दाचा प्रयोग करण्यात येऊ नये.

**सुहास रकवी :-**

साहेब विषय कुठला आहे. तुम्हाला जे सांगितले सकवारचा विषय आहे तो झालेला आहे का?

**मा. सभापती :-**

तुम्हाला माहित आहे का की, पैशाची देवाणघेवाण होते.

**सुहास रकवी :-**

कुठे.

**मा. सभापती :-**

तुम्हाला कुठेही पैशाची देवाणघेवाण होते हे माहित आहे का?

**सुहास रकवी :-**

मी म्हटले देवाणघेवाण करीता रद्द करता का?

(सभागृहात गोंधळ)

**मा. सभापती :-**

पैशाच्या देवाणघेवाणीचा विषय येतो कुठे.

**हंसुकुमार पांडे :-**

ते बोललेना मी माझा शब्द मागे घेतो मग झालेना.

**मा. सभापती :-**

त्यांनी मान्य केले आहे तर विषय असा आहे की ह्याची आपण फेरनिविदा मागवली तर अजून कमी दराने येईल. हा १ टक्के ते ३टक्के दराने कमी आले आहेत. आपल्याकडे ११ टक्के बिलो दराने येतात. त्याने प्रशासन आणि मनपाचा फायदा होणार आहे.

**सुहास रकवी :-**

सगळ्या फेरनिविदा मागवून टाका.

**मा. सभापती :-**

ज्या ११ टक्के बिलो आलेल्या आहेत भरण्यास योग्य आहेत.

**राजेंद्र जैन :-**

३६०० का ढक्कन होता था वो आज १३०० का आया है।

**सुहास रकवी :-**

१२०० भी आयेगा ना।

**प्रभात पाटील :-**

मा. सभापती साहेब ६ नंबरमध्ये त्यांनी किती तरतूद केली आहे.

**नयना वसानी :-**

२० लाखाची तरतूद केली आहे.

**राजेंद्र जैन :-**

इसपे मेरा सुचना है। ५० लाख का प्रस्ताव है यह ढक्कन के जो रहे है आज तक के मनपा के इतिहास में लगातार महंगाई बढती जा रही है। लेकिन ढक्कन का रेट सबसे कम आया है और ५० लाख का तरतूद किया है लेकिन अगर बजेट हो और देढ करोड का टेंडर था और बजेट में तरतूद हो तो यह टेंडर को पूरा देढ करोड तक रखना चाहिए लिमीट नही रखना चाहिए ऐसी मेरी सुचना है।

**प्रभात पाटील :-**

प्रभाग ६ मध्ये त्यांनी भरपूर तरतूद केली आहे.

**हंसुकुमार पांडे :-**

बाकी प्रभागात ५ लाख, ६ लाख केली आहे.

**मा. सभापती :-**

राई, मुर्धा, मोर्वा ह्या साईडला झाकणाचे जास्त नाही आहे.

**हंसुकुमार पांडे :-**

आमचा प्रभाग ३ मोठा आहे ना. आर.एन.पी. पार्क, एस.व्ही.रोड, कस्तूरी पार्क.

**मा. सभापती :-**

मॅडम ६ नंबर त्याच्यापेक्षा मोठा आहे. पेणकर पाडा, काजूपाडा एवढा मोठा प्रभाग आहे. आवश्यकतेनुसार जब जरूरत पडेगी जहॉ जरूरत पडेगी।

**सुहास रकवी :-**

हे दोन विषय पूढल्या सभेत घ्या.

**मा. सभापती :-**

पहिले दोन विषय मागच्या सभेत रद्द केले होते. तरी ते परत आणले आहेत त्याची फेरनिविदा मागवण्यात यावी आणि १ ते ६ ची आवश्यकतेनुसार तरतूद करण्यात यावी.

**प्रभात पाटील :-**

ते अधिकार त्या-त्या विभागाला देऊन टाका.

**सुहास रकवी :-**

पहिले दोन विषय पूढच्या मिटींगमध्ये घ्या. तुम्ही मतदान घ्या.

(सभागृहात गोंधळ)

**मा. सभापती :-**

आवश्यकतेनुसार मंजूरी देण्यात यावी. वेळोवेळी ह्याची मान्यता घेण्यात येईल.

**सुहास रकवी :-**

मा. सभापती महोदय प्रकरण क्र. १३३ चा जो विषय दिला आहे पहिले दोन विषय ठरावाला टाकता ते पूढच्या सभेला घेण्याकरिता मतदान घेतो.

**मा. सभापती :-**

आम्ही निविदा मागवण्यासाठी देतो.

**हंसुकुमार पांडे :-**

सुचना लेलो.

(सभागृहात गोंधळ)

**मा. सभापती :-**

जेव्हा निविदा काढणार तेव्हा व्यवस्थित काढायला सांगू आपण ते ३ टक्के कमी दराने दिले. आलेली निविदा १५ टक्के दराने आलेली निविदा पूर्वीस निगोशिएबल करता आणखी त्याला दीड टक्के कमी करायला लावता.

**सुहास रकवी :-**

तुम्ही हा विषय मतदानाला घ्या.

**मा. सभापती :-**

हरकत नाही पहिले दोन विषय फेरनिविदा आहे.

**सुहास रकवी :-**

माझा त्याच्यावर विरोध आहे.

**मा. सभापती :-**

मतदान घेण्यात यावे.

**मा. उपायुक्त सो. :-**

प्रशासनाचे मत आहे. मला असे मांडायचे आहे विषय क्र. ०१ जो आहे ही निविदा ४ टक्के कमी दराने आहे. फेरनिविदा मागवल्यावर ह्याच्यापेक्षा जास्त दर आले कमी आले तर आनंद आहे. तर ती जबाबदारी निश्चित होईल त्यामुळे हे पहील मंजूर करायला पाहिजे. विषय क्र. ०२ कामच जर ड्रॉप करायचे असेल काम घ्यायचे असेल तर ८ टक्के बिलो ही प्रॉपर रेट आलेले आहेत ते पूढच्या वेळेला.............

**मा. सभापती :-**

दुस-यासाठी बिलोचा विषय नाही त्याच्यासाठी असे आहे की ती पार्टली भिंत बांधायची की पूर्ण ..........

**सुहास रकवी :-**

साहेब तुम्ही बरोबर बोलतात जर काम रद्द करायचे असेल तर तो प्रशासनाचा विषय नाही.

**मा. उपायुक्त सो. :-**

टेंडर इकडे पाठवतो तेव्हा आपण झोपलो होतो का. जेव्हा विषय स्टॅन्डिंगला येतो तेव्हा प्रशासनानी अभ्यास करायला पाहिजे जर तुम्हाला हे काम ड्रॉप करायचे असेल हे काम नाही करायचे नविन काम घ्यायचे आहे तर मग हा विषय ठिक आहे.

**राजेंद्र जैन :-**

अभी ३,४,५,६,७,८ आगे के टेंडर नही देखे है। हमारी भुमिका उसी पर है पहले यह गटर कव्हर ३६०० रुपये का गया था इस बार १३०० रुपये का आया। ८ टक्के कम हो गया है। इसी भुमिका को लेके हम चाहते है की १.३ टक्के कम हो आया है। अगर हम यदी कम करेंगे और इससे कम आएगा ऐसी मेरी आशा है अगर आपकी आशा है किंतू आपका जो विषय है अगर कम हो जाएगा तो हम गलती करेंगे अगर अभीभी कम नहीं आया तो हम इसको इस्तेमाल करने को दे देंगे हम गलत काम नहीं करेंगे।

**मा. सभापती :-**

ह्यासाठी मागवतो की कमी दर यावा.

**सुहास रकवी :-**

पण नाही आल्यास.

**मा. सभापती :-**

नाही आल्यास आपण वाटाघाटी करु शकतो.

**सुहास रकवी :-**

गटाराच्या झाकणाची फेरनिविदा किती वेळा झाली.

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु.)) :-**

मी मा. सभागृहाला सांगू इच्छितो की मी अशा बऱ्याच केसेस हाताळल्या आहेत. एकदा तो निर्णय झाल्यानंतर पुढील फेरनिविदेत ह्यापेक्षा जास्त दर आले तर त्याला गर्व्हमेंटकडून जे ऑडिट होते त्या ऑडिटमध्ये फार मोठ्या प्रमाणावर गंभीर स्वरुपाचा आक्षेप नोंदवला जातो की, कमी दराची निविदा मंजूर न करता फेरनिविदा मागवल्यामुळे भविष्यात ती अबव्ह आली. माझे म्हणणे आहे की ती बिलो निविदा मंजूर करावी.

**राजेंद्र जैन :-**

अगर अभिप्राय निविदा पिछली निविदा से अधिक रहेगी तो उसे मंजूर नहीं किया जाएगा।

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु.)) :-**

असे नाही टाकता येणार.

**सुहास रकवी :-**

असे कोणत्या नियमात आहे.

**मा. सभापती :-**

तुम्ही बोलता असे कुठल्या नियमात आहे. ह्याच्यानंतर आणखी एक निविदा मंजूरी आहे. त्याच्यामध्ये असे कोणत्या नियमात लिहीलेले की एका ठेकेदारानी फक्त दोनच काम करावी. मग हा नियम कसा काढला.

**सुहास रकवी :-**

आपल्याला मा. आयुक्तांनी काय सांगितले ह्याच्यापेक्षा जास्त दराने आल्यास त्याला जबाबदार कोण? दुसरी गोष्ट ते म्हणतात आपण फेरनिविदा देऊ त्याची बिलो आली तर व्हेल ॲन्ड गुड प्रशासनाचा फायदा जर नाही आल्यास .........................

**मा. सभापती :-**

नाही आली. आपण आर्थिक हीत बघूनच करणार आहोत. आपण फेरनिविदा मागवायच्या मागे का आहेत.

**सुहास रकवी :-**

माझा ह्या दोन ह्याला विरोध आहे.

**मा. सभापती :-**

तुमचा विरोध आम्ही नोंदवून घेतो. निविदा मागवताना प्राधान्य द्यावे की आलेल १.३ पेक्षा ती निविदा कमी मध्ये करता आली पाहिजे.

**सुहास रकवी :-**

प्रशासनाला विनंती आहे की, निगोशिएशन जी कमिटी आहे ती कमिटी तुम्ही बरखास्त करुन टाका. साहेब विषय कसा आहे तुम्ही निगोशिएबल करणार कामाचे महत्व कळणार त्यापेक्षा ते सरळ स्टँडिंगला येऊ दे.

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु.)) :-**

साहेब हे निगोशिएशन करुनच हे आलेले आहे. समिती वेगळी आपला निर्णय वेगळा ह्याच्यात मी एवढ सांगू इच्छितो की ह्यापेक्षा जास्त दर कमी येऊ नये. अबव्ह आले तर प्रशासनाची जबाबदारी असणार नाही.

**सुहास रकवी :-**

ह्या मिटींगमध्ये ज्यांनी विरोध दर्शविला आहे त्यांची जबाबदारी असणार नाही.

**राजेंद्र जैन :-**

आप गलत बोल रहे है। हमने क्लिअर बोला है की उस टेंडर में अटीशर्ती डाली जाए की आनेवाली निविदा यह निविदा से अधिक हो तो हम इसको स्विकार करने का बाद्य है।

**सुहास रकवी :-**

असे करुच शकत नाही.

**मा. सभापती :-**

ठराव करुन घ्या.

**स्टिवन मेंन्डोंसा :-**

हे व्हॅलीड आहे की नाही ते सांगा.

**विधी अधिकारी :-**

अशी अट टाकता येणार नाही.

**प्रभात पाटील :-**

आता तुम्ही ही फेरनिविदा काढली आणि रेट हाय आले साहेब बोलले ते इन व्हॅलिड होऊन जाते. परंतु तुम्ही तुमच्या अधिकारात त्यांना कॉलबॅक करु शकत नाही का? ज्यांनी हायरेट टाकले आहेत त्यांना नाही..........

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु.)) :-**

मॅडम आपण त्यांना कॉल करु शकत नाही.

**मा. सभापती :-**

आपण त्यांना बोलू शकत नाही. आपण मागच्या सभेत एक विषय घेतलेला की आपला रेट कितीचा त्यांनी आपल्याला १ लाख २५ हजाराचा रेट दिलेला आपण ठराव केलेला की, त्यांना बोलवून निगाशिएशन कराव. संबंधीत अधिकाऱ्याने त्याचे उत्तर द्याव की, क्रिशयलच्या विषयाबद्दल आपण त्यांना बोलवलेल का?

**शरद बेलवटे :-**

ते कमीत कमी दरापर्यंत आलेले नाहीत ते ७५ पर्यंत आलेले आहेत. १ लाख २५ चे त्यांनी ७५ हजार केलेले आहेत.

**मा. सभापती :-**

तसे त्यांनी लेखी दिले आहे ना.

**शरद बेलवटे :-**

हो.

**मा. सभापती :-**

म्हणजेच पुन्हा त्याला बोलावले तर तो कमी रेट करुन देईल का?

**भागवत मूरकूटे :-**

मा. सभापतीच्या परवानगीने बोलतो की, कन्डीशनल निविदा आपल्याला बोलावता येणार नाही. हे जर टेंडर आपल्याला रद्द करायचे असेल तर पहिली निविदा प्रक्रिया पूर्ण रद्द होऊन जाईल. हे फ्रेश टेंडर असेल. आपली अट असेल की ८ टक्के बिलो यावे तर ते रेट येईपर्यंत रि-टेंडर करायला लागेल.

**मा. सभापती :-**

आपण ५-५ वेळा करतो आणि आपल्याला कमी रेट येतात.

**भागवत मूरकूटे :-**

आताची प्रक्रिया रद्दच होऊन जाईल.

**मा. सभापती :-**

आताची आम्ही रद्दच करतो.

**सुहास रकवी :-**

साहेब ते काम करायचे नाही अशी मनस्थिती आहे का.

(सभागृहात गोंधळ)

**मा. सभापती :-**

प्रशासनाचा पैसा वाचवायचा .....................

**सुहास रकवी :-**

दोन वेळा झाल्यानंतर आणखी किती वेळा करणार.

**मा. सभापती :-**

तुम्ही ठराव मांडा.

**सुहास रकवी :-**

ह्याला आमचा विरोध असेल. ह्याला आम्ही जबाबदार असणार नाही. विरोध नोंदवा. सुचनेसह विरोध नोंदवा. उदया जर कोर्टमॅटर झाले तर त्याला आम्ही जबाबदार असणार नाही.

**मा. सभापती :-**

ठराव बहुमताने मंजूर. पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. १३३ :-**

मा. स्थायी समिती सभा दि. २९/१२/२०१४, प्रकरण क्र. १२१ मधील प्रकरण फेरसादर करणे.

**ठराव क्र. १२७ :-**

वरील विषयानुसार मा. स्थायी समिती सभा दि. २९/१२/२०१४ प्रकरण क्र. १२१ अन्वये निविदांना मान्यता देणेसाठी सादर केलेल्या प्रस्तावात खालील कामांचा समावेश होता.

| अ क्र. | टेंडर आय.डी | कामाचे नांव / ठेकेदाराचे नांव | अंदाजित खर्च / ठेकेदाराने सादर केलेले दर | मा.आयुक्त यांची प्रशासकीय/ आर्थिक मान्यता दिनांक | वृत्तपत्राचे नाव व प्रसिध्दी दिनांक | मा. निविदा समिती बैठकीची शिफारस | ई-टेंडरींग निविदा प्रसिध्दी दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | २२२३३ | **भाईंदर (प.) प्रभाग क्र. २७ मधील स्मशानभुमी विकसीत करणे. (दलित वस्ती अनुदान) (दोन मुदतवाढी)**<br>**१.मे. ऐश्वर्या इंटरप्रायझेस** | **रु. ४९,४०,४००/-**<br>१.३३% कमी दराने<br>**दरवाटाघाटीनंतर ४.००% कमी दराने** | दि. १७/०६/२०१४ | दै. फ्रि प्रेस जर्नल/ दै. धावते नवनगर<br>दि. १०/०८/२०१४ | दि. २६/११/२०१४ | दि.११/०८/२०१४ |
| २ | २२२८० | **उत्तन घनकचरा प्रकल्प पायथ्याशी कुंपणभिंत बांधणे.**<br>**(फेर निविदा) (दोन मुदतवाढी)**<br>**१.मे. आर ॲण्ड बी इंन्फ्रा प्रोजेक्टस प्रा.लि.**<br>२.मे. देव इंजिनिअर्स | **रु.४,३२,२२,७८०/-**<br>७.३% कमी दराने<br>**दरवाटाघाटीनंतर ८.००% कमी दराने**<br>२१.००% जास्त दराने | दि. ०७/०७/२०१४ | दै. लोकसत्ता/ दै. फ्रि प्रेस जर्नल<br>दि. २२/०८/२०१४ | दि. २६/११/२०१४ | दि.२५/०८/२०१४ |
| ३ | २२२९६ | **मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती क्र. १ मधील फुटपाथ/नाले/गटारे यावरील साफसफाई करीता आर.सी.सी झाकणे बसविणे** | - | | दै.फ्रि प्रेस जर्नल/ दै. ठाणे की आवाज<br>दि. १२/०७/२०१४ | दि. १६/१२/२०१४ | दि. २८/०८/२०१४ |
| | SR NO. | DESCRIPTION | | PER | **NARESH CONSTRUCTION** | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | **B – 2 RATE QUOTE BY CONTRACTOR** | | |
| | | ITEM NO. 1<br>Providing and Fixing in position precast RCC Cover on Gutter/ Footpath/ Nalla of 75 mm thick M 30 Grade with main & distribution steel 12 mm fro @100 mm c/c with covering of 0.90 mm thick G.I. plate by providing sufficient hook for lifting (with all leads) as per drawing attached and as per instruction given by site in charge.<br>(0.60M x 0.60M, 0.75M x 0.75M, 0.60M x 0.75M, 0.75M x 0.90M, 0.90M x 0.90 M, 1.2 M x 1.20 M etc. )<br>RCC Concrete Cover (for pedestrian Use) | | SMT | **1305/-** | | |
| | | ITEM NO. 2<br>Providing and Fixing in position precast RCC Cover on main road of 100 mm thick M 30 Grade with main & distribution steel 16 mm fro @100 mm c/c with covering of 0.90 mm thick G.I. plate by providing sufficient hook for lifting (with all leads) as per drawing attached and as per instruction given by site in charge.<br>Mainly Sizes as follows.<br>(0.60M x 0.60M, 0.75M x 0.75M, 0.60M x 0.75M, 0.75M x 0.90M, 0.90M x 0.90 M, 1.2 M x 1.20 M etc. )<br>RCC Concrete Cover (for Main Road Use) | | SMT | **2232/-** | | |
| ४ | २२२९७ | **मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती क्र. २ मधील फुटपाथ/नाले/गटारे यावरील साफसफाई करीता आर.सी.सी झाकणे बसविणे** | - | | दै.फ्रि प्रेस जर्नल/ दै. ठाणे की आवाज दि. १२/०७/२०१४ | दि. १६/१२/२०१४ | दि. २८/०८/२०१४ |
| | SR NO. | DESCRIPTION | | PER | **NARESH CONSTRUCTION** | | |
| | | | | | **B – 2 RATE QUOTE BY CONTRACTOR** | | |
| | | ITEM NO. 1<br>Providing and Fixing in position precast RCC Cover on Gutter/ Footpath/ Nalla of 75 mm thick M 30 Grade with main & distribution steel 12 mm fro @100 mm c/c with covering of 0.90 mm thick G.I. plate by providing sufficient hook for lifting (with all leads) as per drawing attached and as per instruction given by site in charge.<br>(0.60M x 0.60M, 0.75M x 0.75M, 0.60M x 0.75M, 0.75M x 0.90M, 0.90M x 0.90 M, 1.2 M x 1.20 M etc. ) | | SMT | **1305/-** | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | RCC Concrete Cover (for pedestrian Use) | | | | | |
| | | ITEM NO. 2<br>Providing and Fixing in position precast RCC Cover on main road of 100 mm thick M 30 Grade with main & distribution steel 16 mm fro @100 mm c/c with covering of 0.90 mm thick G.I. plate by providing sufficient hook for lifting (with all leads) as per drawing attached and as per instruction given by site in charge.<br>Mainly Sizes as follows.<br>(0.60M x 0.60M, 0.75M x 0.75M, 0.60M x 0.75M, 0.75M x 0.90M, 0.90M x 0.90 M, 1.2 M x 1.20 M etc. )<br>RCC Concrete Cover (for Main Road Use) | | SMT | **2232/-** | | |
| ५ | २२२९८ | **मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती क्र. ३ मधील फुटपाथ/नाले/गटारे यावरील साफसफाई करीता आर.सी.सी झाकणे बसविणे** | - | | दै.फ्रि प्रेस जर्नल/ दै. ठाणे की आवाज दि. १२/०७/२०१४ | दि. १६/१२/२०१४ | दि. २८/०८/२०१४ |
| | SR NO. | DESCRIPTION | | PER | **NARESH CONSTRUCTION** | | |
| | | | | | **B – 2 RATE QUOTE BY CONTRACTOR** | | |
| | | ITEM NO. 1<br>Providing and Fixing in position precast RCC Cover on Gutter/ Footpath/ Nalla of 75 mm thick M 30 Grade with main & distribution steel 12 mm fro @100 mm c/c with covering of 0.90 mm thick G.I. plate by providing sufficient hook for lifting (with all leads) as per drawing attached and as per instruction given by site in charge.<br>(0.60M x 0.60M, 0.75M x 0.75M, 0.60M x 0.75M, 0.75M x 0.90M, 0.90M x 0.90 M, 1.2 M x 1.20 M etc. )<br>RCC Concrete Cover (for pedestrian Use) | | SMT | **1305/-** | | |
| | | ITEM NO. 2<br>Providing and Fixing in position precast RCC Cover on main road of 100 mm thick M 30 Grade with main & distribution steel 16 mm fro @100 mm c/c with covering of 0.90 mm thick G.I. plate by providing sufficient hook for lifting (with all leads) as per drawing attached and as per instruction given by site in charge.<br>Mainly Sizes as follows. | | SMT | **2232/-** | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | (0.60M x 0.60M, 0.75M x 0.75M, 0.60M x 0.75M, 0.75M x 0.90M, 0.90M x 0.90 M, 1.2 M x 1.20 M etc. )<br>RCC Concrete Cover (for Main Road Use) | | | | | |
| ६ | २२२९९ | **मिरा-भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती क्र. ४ मधील फुटपाथ/नाले/गटारे यावरील साफसफाई करीता आर.सी.सी झाकणे बसविणे** | - | | दै.फ्रि प्रेस जर्नल/ दै. ठाणे की आवाज दि. १२/०७/२०१४ | दि. १६/१२/२०१४ | दि. २८/०८/२०१४ |
| | SR NO. | DESCRIPTION | | PER | **NARESH CONSTRUCTION** | | |
| | | | | | **B – 2 RATE QUOTE BY CONTRACTOR** | | |
| | | ITEM NO. 1<br>Providing and Fixing in position precast RCC Cover on Gutter/ Footpath/ Nalla of 75 mm thick M 30 Grade with main & distribution steel 12 mm fro @100 mm c/c with covering of 0.90 mm thick G.I. plate by providing sufficient hook for lifting (with all leads) as per drawing attached and as per instruction given by site in charge.<br>(0.60M x 0.60M, 0.75M x 0.75M, 0.60M x 0.75M, 0.75M x 0.90M, 0.90M x 0.90 M, 1.2 M x 1.20 M etc. )<br>RCC Concrete Cover (for pedestrian Use) | | SMT | **1305/-** | | |
| | | ITEM NO. 2<br>Providing and Fixing in position precast RCC Cover on main road of 100 mm thick M 30 Grade with main & distribution steel 16 mm fro @100 mm c/c with covering of 0.90 mm thick G.I. plate by providing sufficient hook for lifting (with all leads) as per drawing attached and as per instruction given by site in charge.<br>Mainly Sizes as follows.<br>(0.60M x 0.60M, 0.75M x 0.75M, 0.60M x 0.75M, 0.75M x 0.90M, 0.90M x 0.90 M, 1.2 M x 1.20 M etc. )<br>RCC Concrete Cover (for Main Road Use) | | SMT | **2232/-** | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ७ | २२३०० | **मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती क्र. ५ मधील फुटपाथ/नाले/गटारे यावरील साफसफाई करीता आर.सी.सी झाकणे बसविणे** | - | | दै.फ्रि प्रेस जर्नल/ दै. ठाणे की आवाज दि. १२/०७/२०१४ | दि. १६/१२/२०१४ | दि. २८/०८/२०१४ |
| | SR NO. | DESCRIPTION | | PER | **NARESH CONSTRUCTION** | | |
| | | | | | **B – 2 RATE QUOTE BY CONTRACTOR** | | |
| | | ITEM NO. 1<br>Providing and Fixing in position precast RCC Cover on Gutter/ Footpath/ Nalla of 75 mm thick M 30 Grade with main & distribution steel 12 mm fro @100 mm c/c with covering of 0.90 mm thick G.I. plate by providing sufficient hook for lifting (with all leads) as per drawing attached and as per instruction given by site in charge.<br>(0.60M x 0.60M, 0.75M x 0.75M, 0.60M x 0.75M, 0.75M x 0.90M, 0.90M x 0.90 M, 1.2 M x 1.20 M etc. )<br>RCC Concrete Cover (for pedestrian Use) | | SMT | **1305/-** | | |
| | | ITEM NO. 2<br>Providing and Fixing in position precast RCC Cover on main road of 100 mm thick M 30 Grade with main & distribution steel 16 mm fro @100 mm c/c with covering of 0.90 mm thick G.I. plate by providing sufficient hook for lifting (with all leads) as per drawing attached and as per instruction given by site in charge.<br>Mainly Sizes as follows.<br>(0.60M x 0.60M, 0.75M x 0.75M, 0.60M x 0.75M, 0.75M x 0.90M, 0.90M x 0.90 M, 1.2 M x 1.20 M etc. )<br>RCC Concrete Cover (for Main Road Use) | | SMT | **2232/-** | | |
| ८ | २२३०१ | **मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती क्र. ६ मधील फुटपाथ/नाले/गटारे यावरील साफसफाई करीता आर.सी.सी झाकणे बसविणे** | - | | दै.फ्रि प्रेस जर्नल/ दै. ठाणे की आवाज दि. १२/०७/२०१४ | दि. १६/१२/२०१४ | दि. २८/०८/२०१४ |
| | SR NO. | DESCRIPTION | | PER | **NARESH CONSTRUCTION** | | |
| | | | | | **B – 2 RATE QUOTE BY CONTRACTOR** | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | ITEM NO. 1<br>Providing and Fixing in position precast RCC Cover on Gutter/ Footpath/ Nalla of 75 mm thick M 30 Grade with main & distribution steel 12 mm fro @100 mm c/c with covering of 0.90 mm thick G.I. plate by providing sufficient hook for lifting (with all leads) as per drawing attached and as per instruction given by site in charge.<br>(0.60M x 0.60M, 0.75M x 0.75M, 0.60M x 0.75M, 0.75M x 0.90M, 0.90M x 0.90 M, 1.2 M x 1.20 M etc. )<br>RCC Concrete Cover (for pedestrian Use) | SMT | **1305/-** |
| | | ITEM NO. 2<br>Providing and Fixing in position precast RCC Cover on main road of 100 mm thick M 30 Grade with main & distribution steel 16 mm fro @100 mm c/c with covering of 0.90 mm thick G.I. plate by providing sufficient hook for lifting (with all leads) as per drawing attached and as per instruction given by site in charge.<br>Mainly Sizes as follows.<br>(0.60M x 0.60M, 0.75M x 0.75M, 0.60M x 0.75M, 0.75M x 0.90M, 0.90M x 0.90 M, 1.2 M x 1.20 M etc. )<br>RCC Concrete Cover (for Main Road Use) | SMT | **2232/-** |

वरील पैकी अ.क्र. १ व २ यासाठी दि. २९/१२/२०१४ रोजी झालेल्या स्थायी समिती सभेत प्रकरण क्र. १२१ व ठराव क्र. ११६ या निविदांना मान्यता देणेबाबत सदर दोन्ही कामांच्या फेर निविदा मागविण्यात याव्यात, असा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला होता. तरीसुध्दा सदर अ.क्र. १ व २ या निविदांच्या मंजूरीबाबत आजच्या सभेत विषय फेरसादर करण्यात आलेले आहेत. तरी अ.क्र. १ कामाची फेरनिविदा मागविल्यास अजून कमी दराने मनपाच्या आर्थिक फायद्याच्या दृष्टीने महत्वाचे ठरते. म्हणून सदर अ.क्र. १ ची निविदा रद्द करुन अ.क्र. १ ची फेरनिविदा मागविण्यात यावी. अ.क्र. २ घनकचरा प्रकल्प मिरा भाईंदर महानगरपालिकेत सुरु नाही. तसेच भविष्यात आपण घनकचरा प्रकल्प सकवार येथे स्थलांतरीत करीत आहोत. म्हणून पाटील कुंपणभिंत बांधण्यात काही अर्थ दिसत नाही. तसेच जर जागा सुरक्षित करण्याच्या हेतूने कुंपणभिंत बांधणे असल्यास संपूर्ण क्षेत्रात भिंत बांधण्यासाठी नव्याने निविदा मागविणेसाठी अ.क्र. २ ची मागविलेली निविदा रद्द करण्यात येते. अ.क्र. ३ नुसार प्रभाग समिती १ करीता रु. ५ लाख वापरण्यात यावे. अ.क्र. ४ नुसार प्रभाग समिती क्र. २ करीता रु. ६ लाख वापरण्यात यावेत. अ.क्र. ५ नुसार प्रभाग समिती क्र. ३ करीता रु. ६ लाख वापरण्यात यावेत. अ.क्र. ६ नुसार प्रभाग समिती क्र. ४ करीता रु. ६ लाख वापरण्यात यावेत. अ.क्र. ७ नुसार प्रभाग समिती क्र. ५ करीता ही सभा रु. ७ लाख वापरण्यात यावेत. अ.क्र. ८ नुसार प्रभाग समिती क्र. ६ करीता रु. २० लाख एवढी रक्कम वापरण्यात यावी. वरील नुसार ठराव मांडण्यात येत आहे. झाकणांच्या प्रभाग क्र. १ ते ६ साठी मंजूर केलेली तरतूद संपल्यास जादा खर्चासाठी सदर मंजूर दराने पुन्हा स्थायी समिती सभेपुढे विषय ठेवावा व जो पर्यंत बिलो निविदा येत नाही, फेरनिविदा मागवत रहावे.

**सुचक :- डॉ. नयना वसाणी अनुमोदक :- श्री. अश्विन कासोदरीया**

**ठराव बहुमताने मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १३४, महानगरपालिका कर्मचाऱ्यांकरिता विमा लागू करणेबाबत.

**सुहास रकवी :-**

गोषवारा न देता विषय आणलेला आहे.

**मा. सभापती :-**

माझ्या माहितीप्रमाणे मागील वर्षापासून कर्मचारी विम्यापासून अलिप्त राहीलेले आहेत संबंधीत अधिकाऱ्यांनी माहिती द्यावी.

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु.)) :-**

सचिचांनी ह्यापूढे गोषवारा आल्याशिवाय विषय लावू नये. ह्या विषयामध्ये मा. आयुक्तांनी असे निर्देश दिले की ज्या शासकीय चार कंपन्या आहेत त्या चार कंपन्याकडून दरपत्रक मागवा ते दरपत्रक थेट कंपन्याकडून मागवायचे की पेपरला जाहिरात देऊन मागवायचे त्यानंतर स्टँडिंग कमिटीला प्रस्ताव पाठवू. त्यामुळे तो गोषवारा आला नाही.

**मा. सभापती :-**

आपल्याकडे ह्याची प्रक्रिया झाली नव्हती का?

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु.)) :-**

प्रक्रिया झाली होती. एक युनायटेड कंपनीचे लोवेस्ट आला होता. त्याला कर्मचाऱ्याच्या विविध संघटनाचा विरोध आहे. त्याला कर्मचाऱ्याच्या विविध संघटनांचा विरोध आहे की ती खाजगी कंपनी आहे परंतु तसे काही नाही त्याचा आय.आर.डी. येथून नोंदणीकृत आहे. त्याचा तो हक्क आणि अधिकार आहे.

**मा. सभापती :-**

कंपनी नोंदणीकृत नव्हती.

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु.)) :-**

आय.आर.डी. नोंदणीकृत आहे.

**सुहास रकवी :-**

२०१४ ला त्याची निविदा प्रक्रिया चालू होती. त्याच्यामध्ये नॅशनल इन्शूरन्स कंपनीला हे दिल होत त्याचे बिलो टेंडर होते. पण ते आज स्थायी समितीपूढे आलेच नाही. तेही तुम्ही तपासून बघा आणि तो विषय नंतर आणा. कारण शासकीय आणि निमशासकीय लोकांना कंपन्यांचा इन्शूरन्स द्यावा असे आपण जाहिर सुचनेमध्ये दिले आहे. त्यानुसार दिले गेले पाहिजे. हा विषय पुढच्या सभेमध्ये गोषवारा देऊन करा अशी आमची विनंती.

**प्रभात पाटील :-**

नॅशनल इन्शूरन्स कंपनीने ॲडीशनल कमिशनरकडे काहीतरी सादर केलेले आहे.

**नयना वसानी :-**

आमचा ह्याच्यावर ठराव आहे.

**सुहास रकवी :-**

टेंडर त्यांनी भरलेले होते का? विषय आपण पुढच्या सभेत घ्या असे आमचे म्हणणे आहे.

**नयना वसानी :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका कर्मचाऱ्यांना विमा लागू करण्यासाठी निविदा प्रक्रियेद्वारे निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर निविदांमध्ये कमी दराने आलेल्या निविदांना मान्यता देणे नियमाने योग्य आहे. मागील वर्षापासुन मिरा-भाईंदर महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यांचा विमा प्रश्न प्रलंबित आहे. सदर कर्मचाऱ्यांना विमा योग्य वेळेत मिळाला नाही तर त्यांचे बोनसचे नुकसान होईल व विमा योजनेचा लाभ घेता येणार नाही. तसेच कर्मचाऱ्यांचे लेखी निवेदन आहे की, विमा करण्याकरीता शासनमान्य व नामंकित कंपनीस विमाधारक म्हणून नेमण्यात यावे.

मा. स्थायी समिती सभापती तसेच मा. आयुक्त यांचेकडे आलेल्या पत्रान्वये न्यू इंडिया एंश्योरन्स कंपनी लिमिटेड ही शासनमान्य असुन नामांकित देखील आहे. सदर कंपनीने निविदा प्रक्रियामध्ये कमी दरात विमा उपलब्ध करून देण्यास तयारी दर्शविली आहे. तरी कर्मचाऱ्यांच्या मागणीनुसार शासनमान्य व नामंकित न्यू इंडिया एंश्योरन्स कंपनी लिमिटेड या कंपनीस देणे योग्य होईल किंवा कसे याबाबत कलम ५ (२) (२) अन्वये मा. आयुक्त यांना पुढील अधिकार प्रधान करण्यात येत आहेत, असा ठराव मांडत आहे.

**सुहास रकवी :-**

मॅडम गोषवारा नाही आहे. ही माहिती फक्त तुम्हालाच आहे. सदस्यांना कोणती माहिती नाही. कोणताही पेपर नाही हा विषय रितसर आणा. शासकीय निमशासकीय आपले जे पैसे विम्याचे जाणार ते गव्हर्मेंटलाच जाणार.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

आपने जो बोला मुझे जानकारी चाहिए की शासकीय, निमशासकीय होना चाहिए था तो जो टेंडर निकाला ................

**सुहास रकवी :-**

यह लोग ने पेपर नोटिस निकाला था।

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु.)) :-**

मा. सभापती महोदय वर्तमान पत्रात जाहिरात देताना शासकीय, निमशासकीय, राष्ट्रीय मंजूर असे तिन्ही शब्द त्या निविदा प्रक्रियामध्ये दिले होते. आता एकही शासकीय कंपनी नाही सगळ्या पब्लिक अंडरटेकींग आहेत. महत्वाची अट आय.आर.डी कडून नोंदणी असावी. जसा एखादा व्यवसाय करायला लायसन्स घ्यायला पाहिजे तसे विमा कंपनी एस्टॅब्लीश करण्यासाठी आय.आर.डी. कडे नोंदणी करणे गरजेचे आहे. ते वाक्य त्या निविदा सुचनेमध्ये नव्हते. त्यामुळे काही लोकांचा गैरसमज झाला किंवा काही लोकांना क्ल्यू मिळाला की ही शासकीय नाही निमशासकीय आहे, निमशासकीय नाही. पण अशी कोणती कंपनी शासकीय नाही उरलेल्या सगळ्या निमशासकीय आहेत. सगळ्याच खाजगी आहेत पण सगळ्याच निमशासकीय आहेत.

**राजेंद्र जैन :-**

इसका मतलब यह हुआ की शर्ते स्पष्ट नहीं थी।

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु.)) :-**

टेंडर की शर्ते क्लिअर थी। कन्डीशन भी सही थी। समझने वालो को क्लिअर समझा नहीं क्योंकी आय.आर.डी. के अंडर जो भी रजिस्टर है वो सब निमशासकीय है। मॅडमने जो प्रपोजल दिया है वह कर्मचारी की डिमांड है। कर्मचाऱ्यांची भावना काय आहे कंपनी ही जरी आय.आर.डी. नोंदणीकृत असली तरी ती एक प्रकारची खाजगी आहे. आपण गाडी घेतल्यावर आपण न्यू इंडीया किंवा एल.आय.सी. चे काढणार मा.आयुक्ताकडे कर्मचाऱ्यांनी असे निवेदन दिले आहे तर आयुक्ताचे म्हणणे असे कर्मचाऱ्यांना व संघटनाना तो नको आहे. तर आपण त्या सगळ्यांचे दर मागवू या. कर्मचाऱ्यांना काय पाहिजे न्यू इंडिया इन्श्यूरन्स त्यानंतर युनायटेड तसेच एल.आय.सी. असे दोन चार कंपन्या आहे. त्यातील कोणतेही एल.आय.सी. कोट करायला तयार नाही. मी स्वतः त्यांच्याशी बोललो होतो. आता मॅडमनी हा विषय ....................

**मा. सभापती :-**

विषय तोच आहे. आपण शासकीयला देतो आहे.

**सुहास रकवी :-**

मग शासकीय ह्याची टेंडर निविदा तुमच्या २९/१०/२०१४ ह्याच्यात आलेली आहे. परत तुम्ही टेंडर मागवा त्यानुसार करुन घ्या.

**मा. सभापती :-**

बहुमतानी मी तेच सांगितले बहुमताने. परत टेंडर मागविले परत ती प्रक्रिया होणार, त्याला महिना दोन महिना जाणार.

**सुहास रकवी :-**

तुम्ही शॉट नोटिस द्याना तुम्ही शॉट नोटिसने करु शकता. करायचे आहेत तर साहेब तुम्ही करु शकता.

**मा. सभापती :-**

त्या निविदा प्रक्रियेला किती वेळ जाईल फेर निविदा मागविल्यावर आणि मंजूरीला.

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु.)) :-**

आपल्या महापालिका अधिनियमानुसार किमान सात दिवस आणि कम्प्लीटली एक महिना देतो तर १० ते १२ दिवसाची मुदत देऊन आपण फेर निविदा मागवू शकतो.

**मा. सभापती :-**

कर्मचाऱ्यांच्या हिताचा विषय आहे. ठरवायचा का नाही ठरवायचा सगळ्यांनी मिळून सांगा ना. त्याच्यातून निविदा आली पाहिजे ना सात दिवस.

**स्टिवन मेन्डोंसा :-**

विषय रितसर येऊ द्या. ह्याला कोण विरोध करत नाही.

**मा. सभापती :-**

विरोधाचा विषय नाही. सात दिवस असेल तर आपण पण तयार आहोत. आज नोटिस पाठवणार प्रसिध्दी करणार मंजूर झाल्यावर परत स्टँडिंगला मान्यता परत आणखी सहा दिवस १५ दिवसात मंजूर होऊन तो स्टॅन्डिंगला आला कमिटीमध्ये पण ८ दिवस विषय चालतो.

**सुहास रकवी :-**

जुनी ज्यांनी निविदा भरली आहे नॅशनल इन्श्यूरन्स ती तपासणी करा त्यांनी भरलेली आहे ती सुध्दा शासकीय आहे. ते बिलो कोट मग ते म्हणतील आम्हाला द्या.

**मा. सभापती :-**

न्यू इंडिया वाल्याच आता जे कोट आहे त्यानी मला पत्र दिलेले माझ्या पत्राप्रमाणे मी सांगतो.

**सुहास रकवी :-**

२९/१०/२०१४ ला निविदा काढली आहे मग त्याचे काय? ते उद्या कोर्टात गेले तर काय करणार टेंडर ओपन केला. बिलोला सॅक्शन करता.

**मा. सभापती :-**

विषय तो नाही आहे ज्याला मंजूर झाला आहे त्याच्यापेक्षा कमी दराने तो पण द्यायला तयार झाला ती पण न्यु इंडियाचीच कंपनी कर्मचाऱ्यांना हवी तशीच आहे. त्यानी मला पण पत्र दिले आहे. कर्मचाऱ्यांचे पत्र पण मी वाचले. त्याच्यामध्ये आहे. त्यांना द्यायचे की नाही द्यायचे ते मा. आयुक्तांना ठरवू द्या.

**सुहास रकवी :-**

मा. आयुक्तांनी दिले तरी स्थायी समितीने मान्यता दिली की नाही.

(सभागृहात गोंधळ)

**सुहास रकवी :-**

ज्या निविदा आल्या आहेत त्याची छाननी करुन.

**मा. सभापती :-**

तुम्ही ठराव ऐकला त्याच्यात लिहीले आहे देण्यास योग्य आहे का?

**सुहास रकवी :-**

मा. आयुक्तांकडेच सोपवा.

**नयना वसानी :-**

तरी कर्मचाऱ्याच्या मागणी अनुसार व शासन मान्य व नामाकिंत न्यू इंडिया इन्श्यूरन्स कंपनी लि. ह्या कंपनीस देणे योग्य होईल किंवा कसे ह्याबाबत कलम ५ (२) २ अन्वये मा. आयुक्त ह्यांना पुढील अधिकार प्रदान करण्यात येत आहे.

**सुहास रकवी :-**

मॅडम तुमचे बरोबर आहे. त्याच्यात माझी अशी सुचना राहील की ज्या निविदा मागवल्या आहेत त्याची छाननी करुन मा. आयुक्तांनी निर्णय घ्यावे.

**नयना वसानी :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका कर्मचाऱ्यांना विमा लागू करण्यासाठी निविदा प्रक्रियेद्वारे निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर निविदांमध्ये कमी दराने आलेल्या निविदांना मान्यता देणे नियमाने योग्य आहे. मागील वर्षापासुन मिरा-भाईंदर महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यांचा विमा प्रश्न प्रलंबित आहे. सदर कर्मचाऱ्यांना विमा योग्य वेळेत मिळाला नाही तर त्यांचे बोनसचे नुकसान होईल व विमा योजनेचा लाभ घेता येणार नाही. तसेच कर्मचाऱ्यांचे लेखी निवेदन आहे की, विमा करण्याकरीता शासनमान्य व नामंकित कंपनीस विमाधारक म्हणून नेमण्यात यावे.

मा. स्थायी समिती सभापती तसेच मा. आयुक्त यांचेकडे आलेल्या पत्रान्वये न्यू इंडिया एंश्योरन्स कंपनी लिमिटेड ही शासनमान्य असुन नामांकित देखील आहे. सदर कंपनीने निविदा प्रक्रियामध्ये कमी दरात विमा उपलब्ध करून देण्यास तयारी दर्शविली आहे. तरी कर्मचाऱ्यांच्या मागणीनुसार शासनमान्य व नामंकित न्यू इंडिया एंश्योरन्स कंपनी लिमिटेड या कंपनीस देणे योग्य होईल किंवा कसे याबाबत कलम ५ (२) (२) अन्वये मा. आयुक्त यांना पुढील अधिकार प्रधान करण्यात येत आहेत, असा ठराव मांडत आहे.

**अश्विन कासोदरिया :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

तुम्हाला तुमचा ठराव मागे घ्यावा लागेल.

**सुहास रकवी :-**

ठराव मागे घेत आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजूर करण्यात यावा.

**प्रकरण क्र. १३४ :-**

महानगरपालिका कर्मचाऱ्यांकरिता विमा लागू करणेबाबत.

**ठराव क्र. १२८ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका कर्मचाऱ्यांना विमा लागू करण्यासाठी निविदा प्रक्रियेद्वारे निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर निविदांमध्ये कमी दराने आलेल्या निविदांना मान्यता देणे नियमाने योग्य आहे. मागील वर्षापासुन मिरा-भाईंदर महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यांचा विमा प्रश्न प्रलंबित आहे. सदर कर्मचाऱ्यांना विमा योग्य वेळेत मिळाला नाही तर त्यांचे बोनसचे नुकसान होईल व विमा योजनेचा लाभ घेता येणार नाही. तसेच कर्मचाऱ्यांचे लेखी निवेदन आहे की, विमा करण्याकरीता शासनमान्य व नामंकित कंपनीस विमाधारक म्हणून नेमण्यात यावे.

मा. स्थायी समिती सभापती तसेच मा. आयुक्त यांचेकडे आलेल्या पत्रान्वये न्यू इंडिया एंश्योरन्स कंपनी लिमिटेड ही शासनमान्य असुन नामांकित देखील आहे. सदर कंपनीने निविदा प्रक्रियामध्ये कमी दरात विमा उपलब्ध करून देण्यास तयारी दर्शविली आहे. तरी कर्मचाऱ्यांच्या मागणीनुसार शासनमान्य व नामंकित न्यू इंडिया

एंश्योरन्स कंपनी लिमिटेड या कंपनीस देणे योग्य होईल किंवा कसे याबाबत कलम ५ (२) (२) अन्वये मा. आयुक्त यांना पुढील अधिकार प्रधान करण्यात येत आहेत, असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- डॉ. नयना वसाणी अनुमोदन :- श्री. अश्विन कासोदरीया**

**सदर ठरावात सन्मा. सदस्य श्री. सुहास रकवी यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली आहे.**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या स्थायी अस्थापनेवर कार्यरत कर्मचाऱ्यांकरीता ग्रुप मेडिक्लेम योजना लागू करण्यासाठी दि. २९-१०-२०१४ अन्वये सामना दै. वृत्तपत्रात जाहीर सुचना प्रसिध्द करण्यात आलेली होती. त्यानुसार शासकीय/निमशासकीय कंपन्यानाच प्राधान्य देण्यात यावे व निविदा प्रक्रियेनुसार कमी दराची शासकीय/निमशासकीय मूंजरीसाठी मा. आयुक्तांना अधिकार देण्याबाबत मी सुचना करीत असुन सुचनेसहित ठराव मंजूर करण्यात यावा.

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १३५, भाईंदर (प.) डोंगरी येथील चायनीज धाबा ते आईस फॅक्टरी क्रॉस पर्यंत बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे कामास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत. (पाणी पुरवठा विभाग)

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

सदर ठिकाणी महानगरपालिकेची मुख्य वितरण जलवाहिनी १५ ते २० वर्ष जुनी असल्याने जिर्ण होऊन खराब पाण्याचा पाणी पुरवठा होत आहे. तसेच सदर जलवाहिनी जिर्ण व जास्त खोलीमध्ये असल्यामुळे दुरुस्ती करणे जिकरीचे होत आहे. त्यामुळे उपरोक्त परिसरातील वितरण व्यवस्थेवर मोठा परिणाम होऊन रहिवाशांया रोषास सामोरे जावे लागत आहे. सदर ठिकाणी नविन ४०० मि.मी. व्यासाची मुख्य वितरण जलवाहिनी टाकल्यास पाण्याचा दाब वाढण्यास मदत होईल व लोकांची पाणी समस्या कमी होण्यास मदत होईल. तरी सदर ठिकाणी ४०० मि.मी. व्यासाची नविन बिडाची जलवाहिनी अंथरणे अत्यंत गरजेचे आहे.

सदर कामी रू. ४९,३६,७००/- इतका अंदाजित खर्च अपेक्षित आहे. तरी सदर काम करणे अत्यावश्यक असल्याने आर्थिक व प्रशासकीय मान्यता हि सभा देत आहे.

**अश्विन कासोदरिया :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजूर.

**प्रकरण क्र. १३५ :-**

भाईंदर (प.) डोंगरी येथील चायनीज धाबा ते आईस फॅक्टरी क्रॉस पर्यंत बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे कामास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत. (पाणी पुरवठा विभाग)

**ठराव क्र. १२९ :-**

सदर ठिकाणी महानगरपालिकेची मुख्य वितरण जलवाहिनी १५ ते २० वर्ष जुनी असल्याने जिर्ण होऊन खराब पाण्याचा पाणी पुरवठा होत आहे. तसेच सदर जलवाहिनी जिर्ण व जास्त खोलीमध्ये असल्यामुळे दुरुस्ती करणे जिकरीचे होत आहे. त्यामुळे उपरोक्त परिसरातील वितरण व्यवस्थेवर मोठा परिणाम होऊन रहिवाशांया रोषास सामोरे जावे लागत आहे. सदर ठिकाणी नविन ४०० मि.मी. व्यासाची मुख्य वितरण जलवाहिनी टाकल्यास पाण्याचा दाब वाढण्यास मदत होईल व लोकांची पाणी समस्या कमी होण्यास मदत होईल. तरी सदर ठिकाणी ४०० मि.मी. व्यासाची नविन बिडाची जलवाहिनी अंथरणे अत्यंत गरजेचे आहे.

सदर कामी रू. ४९,३६,७००/- इतका अंदाजित खर्च अपेक्षित आहे. तरी सदर काम करणे अत्यावश्यक असल्याने आर्थिक व प्रशासकीय मान्यता हि सभा देत आहे.

**सुचक :- श्री. हरिश्चंद्र आमगावकर अनुमोदक :- श्री. अश्विन कासोदरीया**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १३६, निविदांना मान्यता देणेबाबत (बांधकाम विभाग)

**नयना वसानी :-**

सदरचा प्रस्ताव संपूर्ण स्पष्टीकरणासह पुढील मा. स्थायी समिती सभेस फेरसादर करण्यांत यावा.

**अश्विन कासोदरिया :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु.)) :-**

मा. सभापती महोदय ह्याच्यावर प्रशासनाचे असे म्हणणे आहे की ४ आलेल्या निविदा ११ टक्के बिलो म्हणजे फार मोठ्या प्रमाणात बिलो रेट आलेले आहे. फेरनिविदेनंतर एवढे बिलो रेट येतील ह्याची शक्यता कमी आहे. हा सुध्दा भविष्यात प्रॉब्लेम निर्माण होऊ शकतो. खर्च फार मोठा आहे. त्यामध्ये काय अबव्ह निविदा आल्या त्यामध्ये जबाबदारी निश्चित होऊ शकते. प्रशासनाची अशी विनंती आहे की आलेल्या निविदा रास्त आणि ११ टक्के बिलो असल्यामुळे त्या मंजूर कराव्या ही विनंती.

**मा. सभापती :-**

संबंधित अधिका-यांनी ह्याची माहिती द्यावी.

**सुहास रकवी :-**

मा. सभापती साहेब त्याच्यात अमाऊंट किती आहे तेच नाही ते कोण दाखवणार?

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु.)) :-**

सुचना मान्य आहे.

**नयना वसानी :-**

डिटेल देण्यात यावी आणि फेरनिविदा मागवण्यात यावी.

**सुहास रकवी :-**

त्याच्यानंतर अबव्ह आली कामाची जेव्हा गरज असते जेव्हा आपण निविदा मागवतो ती काम वेळेत होणे गरजेचे आहे. जेव्हा टेंडर ओपन होतात त्यानंतर स्क्रूटीनी कमिटी आहे. त्याच्यानंतर डिसाईड करतात त्याचे कमी जास्त दर वाटाघाटी करुन मग इथे पुन्हा फेरनिविदा द्यायची.

(सभागृहात गोंधळ)

**मा. सभापती :-**

मी ठेकेदाराला बोलावलेल की तुला ४ टेंडर लागलेली आहेत दोन तुला मागे घ्यायला लागतील. तुझ्यापेक्षा कमी दरात आले आहेत त्यांना आपण देऊ असे मी ठेकेदाराला सांगितले तर ठेकेदाराने मला काय उत्तर दिले की मला आयुक्तांनी सांगितले आहे की, तू मागे घेतले तर मी तुला ब्लॅकलिस्ट करीन. तो बोलला मला ते जमणार पण नाही मी ती चार काम करु शकणार नाही. एवढा मोठा लोड आहे मी करु शकणार नाही. तर आयुक्त बोलले तू चार टेंडर भरले का? तो बोलला मला माहित होत का की मी चार भरले तर चारही मलाच लागतील? चारही त्याला लागले तो मागे घ्यायला तयार आहे.

**सुहास रकवी :-**

चारही निविदा त्याला लागल्या किंवा नाही लागल्या दोनच निविदा पास करायचा हा नियम मला सुध्दा माहित नाही. साहेबाच्या म्हणण्यानुसार एखादे काम येते तर आपण शहराच्या विकास कार्याकरिता एक नियम किंवा टाईम तुम्ही परत परत एकाच प्रोसेसमध्ये जाणार .................

**मा. सभापती :-**

त्यामुळे मी त्या ठेकेदाराला स्वतः बोलवले की चार निविदा आहेत त्यापैकी तु कर, तर तो बोलतो मला दोन झेपणार नाही ........................

**प्रभात पाटील :-**

दोनच काम करायची असा नियम आहे का?

**मा. सभापती :-**

निविदा प्रक्रियेवर लिहीले आहे की दोनच का करायची.

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु.)) :-**

मा. सभापती महोदय निविदा फॉर्ममध्ये किंवा निविदा मागवताना दोनच काम एका ठेकेदाराला देता येतील हे लिहीले होते. परंतु लिहील्यानंतर निविदेची प्रक्रिया कशा पध्दतीने करायला पाहिजे होती ती केली गेली नाही. निविदा मागवल्यानंतर चारही रेट ओपन झाले आता कंत्राटदार स्वतः म्हणतो ११ टक्के बिलो आल्यानंतर मला दोन काम देऊन मुक्ती द्या किंवा मला काम देऊन चार काम रद्द करा जर मनपाच्या हितावर निविदा असेल आणि उघडलेले दर जर चारही बिलो असतील आणि किफायतशीर असेल तर आपल्याला कळते की इस्टीमेंटपेक्षा ११ टक्के बिलो आहे एवढे दर कमी येणे पुन्हा दर कमी येणे शक्यता नाही शक्यता फार कमी आहे. अशा वेळेला सेकंड लोवेस्ट निविदा काढायला बोलू नये आणि त्याच्याशी निविदा निगोशिएट करु नये असे सेंट्रल रेग्यूलराइज कमिशनचे डायरेक्शन आहेत. त्यामुळे आपण चारही काम त्याला कम्पलसर नेगोशिएशनला बोलवल अजून काय कमी करतो का तो बोलतो आहे हे भरपूर आहे मी कमी करु शकत नाही आणि ही चार काम मी करु शकतो असे त्यांनी लेखी दिलेले आहे. त्यामुळे आमची विनंती आणि प्रस्ताव पण आहे की ह्या निविदा मंजूर कराव्या भविष्यात वाढीव दर आल्यास प्रशासन त्याला जबाबदार राहणार नाही.

**सुहास रकवी :-**

फेरनिविदा किती वेळेला रि-कॉल करु शकतो.

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु.)) :-**

निविदा किती वेळेला रि-कॉल करु शकतो ह्याचे उत्तर कायद्यात कुठेच नाही आहे. आलेली निविदा आपल्या कामासाठी किफायतशीर आणि योग्यरितीने आहे की नाही हा ज्यावेळेस त्या आयुक्तांचा विश्वास निर्माण होतो त्यावेळेस फेरनिविदा मागवण्याचे थांबले जाते. म्हणजे एखादी निविदा बोलावल्यानंतर एकदा रि-कॉल केली, दोनदा केली, तीनदा केली ती दहावेळा पण होऊ शकते ती तीनदा पण होऊ शकते. कामाची उपलब्धता किंवा कामाची अत्यंत तातडी आवश्यकता आणि प्राप्त दर दोन्हीचा मेळ घेऊन मा. आयुक्त ती निविदा स्विकारतात मा. आयुक्तांनी स्विकारलेली निविदा ती मंजूरीसाठी स्थायी समितीपूढे पाठवली जाते.

**सुहास रकवी :-**

मंजूरी फेटाळली तर नंतर मा. आयुक्तांना अधिकार आहेत का?

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु.)) :-**

नाही असा मा. आयुक्तांना अधिकार नाही. रि-सबमीट फक्त आयुक्त करु शकतात. आपण घेतलेले निर्णय पुर्नःविलोकन करावे असे आपण न्यायालयामध्ये एक पध्दत आहे रिन्यू करण्याची तसे पुर्नःविचार करायचा मघाशी १३३ नंबरचा विषय आला पण स्थायीने फेटाळल्यानंतर आयुक्त मंजूर करतील असे होत नाही.

**भागवत मुरकुटे :-**

मा. सभापतीच्या परवानगीने बोलतो वाढीव दर प्राप्त झाल्यानंतर मा. आयुक्तांनकडून शिफारस होते. आपण ते दर नाकारले आणि फेरनिविदा प्रक्रियेत गेलो तर फेरनिविदा प्रक्रियेत दोन गोष्टी होतात. फेरनिविदा प्रक्रियेत आपल्याला वाजवी दर प्राप्त व विलंब पण होऊ शकतो. त्या दरम्यान डी.एस.आर रेट चेंज झाला. आपले अंदाजपत्रकातील दर वाढतील. इस्टीमेंट पण वाढेल आणि रेटपण वाढतील. आजच्या दरापेक्षा जास्त दराने ते खर्च करावा लागेल. त्या वेळेस आक्षेप येऊ शकतो. त्यामुळे दर वाजवी यावा खातरजमा झाल्यास त्याला स्विकारायला काय हरकत नाही अशी लेखा परिक्षणाची शिफारस आहे.

**राजेंद्र जैन :-**

मा. सभापती महोदय, इस विषय के अंदर मिरा भाईदर मनपाच्या रस्ते दुरुस्ती करणे. कहाँ-कहाँ दुरुस्ती करेंगे उसका डिस्क्रीप्शन नही है। टोटल अमाऊंट कितना वो भी नहीं है। वो विषय अच्छे से सादर कर दो।

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु.)) :-**

सदस्याची सुचना बरोबर आहे. ह्याच्यात कामाची किंमत आणि डीटेल यायला पाहिजे.

**मा. सभापती :-**

पूर्ण स्पष्टीकरणासोबत विषय पुढच्या सभेला सादर करावा.

**प्रभात पाटील :-**

टेंडर रि-कॉल नाही.

**मा . सभापती :-**

सध्यातर नाही.

**राजेंद्र जैन :-**

मा. आयुक्त को स्थायी समिती का कौनसा भी प्रस्ताव फेटाळने का अधिकार है।

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु.)) :-**

१५ दिवसामध्ये स्थायी समितीने निर्णय घेतला नाही तर तो मंजूर करण्याचा अधिकार मा. आयुक्तांना आहे. परंतु स्थायी समितीने फेटाळला तर तो राज्यशासनाकडे विखंडीत करायला पाठवायला पाहिजे किंवा आपल्याकडे फेरसादर विनंती करायला पाहिजे.

**राजेंद्र जैन :-**

अगर उनको लगता है यह ओके टेंडर आया है निलंबीत करने के बाद वापीस ॲक्सेप्ट कर सकते है ना।

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु.)) :-**

विखंडीत केले म्हणजे मंजूर झाले असे नाही स्टँडिंग कमिटीने हा ठराव नामंजूर केला तो नामंजूर केला म्हणून शासनाकडे विखंडीत करायला पाठवला विखंडीत केल्यानंतर गर्व्हमेंटनी विखंडीत केला म्हणून मा. आयुक्तांचा ठराव मंजूर झाला असे होत नाही. तो कोणीतरी मंजूर केलाच पाहिजे. त्यामुळे पुन्हा तो तुमच्याकडे मंजूरीला येणार.

**सुहास रकवी :-**

पुर्नःविलोकन करुन पण आणतील.

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु.)) :-**

पुर्नःविलोकन कधी करु. तुम्ही नामंजुर केला तर पण तुम्ही आता पुढे मिटींग करताना तो तुमचा अधिकार आहे. आजच मंजूर केला पाहिजे असे काही नाही. कायद्यातील तरतूद आहे की तुम्ही अभ्यास करुन पुढील मिटींगला निर्णय करणार.

**सुहास रकवी :-**

हेच विषय आयुक्त पुर्नःविलोकन करणार.

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु.)) :-**

हा आता नगरसचिवाकडे राहणार. नगरसचिव पुढील अजेंड्यावर प्रलंबीत विषय म्हणून घेणार.

**नयना वसानी :-**

सदरचा प्रस्ताव संपूर्ण स्पष्टीकरणासह पुढील मा. स्थायी समितीत फेरसादर करण्यात यावा.

**अश्विन कासोदरिया :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजूर.

**प्रकरण क्र. १३६ :-**

निविदांना मान्यता देणेबाबत (बांधकाम विभाग)

**ठराव क्र. १३० :-**

सदरचा प्रस्ताव संपूर्ण स्पष्टीकरणासह पुढील मा. स्थायी समिती सभेस फेरसादर करण्यांत यावा.

**सुचक :- डॉ. नयना वसाणी अनुमोदक :- श्री. अश्विन कासोदरीया**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १३७, उपनिबंधक, सहकारी संस्था यांना भाडयाने जागा उपलब्ध करुन देणेस मान्यता देणे.

**सुहास रकवी :-**

साहेब तो विषय सबरजिस्टरला द्यायचा होता ना. त्याच्यामध्ये ५०० फूटाचे कुरळेकर साहेब देतात आणि ॲक्च्युअल रिक्वायरमेंट आहे ४६५ ची.

**मा. सभापती :-**

त्याच्याबरोबर बोलण झाल ते आलेले.

**सुहास रकवी :-**

तुमच्याकडून आम्ही माहिती मागवली.

**मा. सभापती :-**

ते बोलले ठीक आहे.

**सुहास रकवी :-**

आणखी एक विषय सांगू इच्छितो आपल्या मिरा भाईंदरच्या जेवढ्या मालमत्ता आहेत त्या मालमत्ता लवकरात लवकर संस्थेला द्याव्यात. जेणेकरुन त्यांचे मेन्टेनंस किंवा जो खर्च आहे तो आपल्याला होणार नाही.

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु.)) :-**

ही फाईल मी सकाळी मा. आयुक्तांकडे पाठवली. त्याच्या अटीशर्ती डिटेल काढून ह्या प्रॉपर्टी आपण ज्या म्हणता डिस्पोस व्हायला पाहिजेत त्या तशाच पडून न राहता ................

**मा. सभापती :-**

ती सर्वात महत्वाची बाब आहे कारण आपल्या मालमत्तेबाबत मागे झालेले की सिल्वर सरिता जी इमारत आहे निवारा केंद्र तिथे आता बियरबार झालेला आहे. तिकडे एकानी सुसाइड पण केले.

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु.)) :-**

कुरळेकर साहेब पुढच्या मिटींगला ते घ्या. साहेबांकडे फाईल दिलेली आहे.

**मा. सभापती :-**

ह्या विषयासाठी गोषवारा सांगितलेल कारण ते स्वतः उपनिबंधक आलेले मग गोषवारा का सादर करण्यात आला नाही. कमिशनर साहेबांनी सही केली नाही का? आपल्या फायद्याचा विषय आहे की आपल्या नुकसानाचा विषय आहे. शहरामध्ये उपनिबंधक आल्यावर इकडच्या लोकांना ठाण्याला जायला लागणार की नाही लागणार? म्हणजे नागरिकांचा फायदा होणार की नुकसान होणार सही का नाही झाली. त्या गोष्टीला किती दिवस झाले.

**दिपक कुरळेकर (मा. उपायुक्त) :-**

पाच दिवस.

**मा. सभापती :-**

पाच दिवसानंतर आपली सभा लागली एवढा गंभीर विषय तो विषय आणताना तुम्हाला मा. आयुक्तांकडे बोलता येत नाही अशी प्रशासनाची काम होतात हा विषय शहराच्या आणि नागरिकांच्या दृष्टीने महत्वाचा विषय आहे.

**सुहास रकवी :-**

मला आणखी सांगायचे आहे. कुरळेकर साहेब जेवढ्या मालमत्ता आहेत त्याची लवकरात लवकर ज्या संस्थेला द्यायचे त्यामुळे इन्कमपण होईल आणि खर्च कमी होईल.

(सभागृहात गोंधळ)

**मा. सभापती :-**

त्यांनी मागितलेल्या मागणीनुसार ठराव मंजूर करुन देतो. गोषवारा लावून घ्या.

**मोहन जाधव :-**

उपनिबंधक, सहकारी संस्था, ठाणे तालुका, ठाणे या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात मिरा-भाईंदर व नवी मुंबई महानगरपालिका येथील सहकारी गृहनिर्माण तसेच इतर सहकारी संस्थांचा समावेश होतो. सन मार्च २०१४ अखेर या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात एकूण ५,३०६ संस्था नोंदणीकृत झालेल्या आहेत. यापैकी बहुतांश संस्था या मिरा-भाईंदर महानगरपालिका या कार्यक्षेत्रात आहेत. मिरा-भाईंदर क्षेत्रात सध्या असलेले कार्यालय हे एकंदरीत कार्यक्षेत्राचा विचार करता मध्यवर्ती ठिकाणी आहे.

उपनिबंधक, सहकारी संस्था, ठाणे तालुका हे कार्यालय मिरा-भाईंदर हद्दीत स्थलांतरित करण्याकरीता व संस्थांचे कामकाज सुलभतेने व जलद गतीने होण्याकरीता उपनिबंधक, सहकारी संस्था, ठाणे तालुका, ठाणे यांनी पत्रान्वये कळविलेले होते. त्या अनुषंगाने दि.०१/१२/२०१२ मा. महासभा सूचना क्र.३ यानुसार तहकुब मा. महासभा शुक्रवार दि.१४/१२/२०१२, ठराव क्र.२१ अन्वये रामनगर ॲमिनिटी हॉल, मिरारोड (पूर्व) येथे १००० चौ.फूट जागा उपनिबंधक (सहकारी संस्था) यांच्या कार्यालयास शासकीय दराने भाडे घेऊन जागा उपलब्ध करुन देण्यात यावी याबाबत ठराव पारित केलेला आहे.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मिरारोड (पूर्व), शांती गार्डन, रामनगर येथील महानगरपालिकेच्या ॲमिनिटी ओपन स्पेसच्या जागेत बांधलेल्या इमारतीमध्ये उपनिबंधक संस्था, ठाणे तालुका, ठाणे यांना कार्यालयासाठी १००० चौ.फूट जागा शासकीय दराने जागा उपलब्ध करुन देणेबाबत महानगरपालिकेने निर्णय घेतलेला असलेबाबत व जागेचे भाडे ठरविणे, करारनामा करणेच्या कार्यवाहीसाठी संपर्क करुन कार्यवाही करणेबाबत कळविण्यांत आलेले होते.

उपनिबंधक, सहकारी संस्था, ठाणे तालुका यांनी मिरा-भाईंदर शहरातील सहकारी संस्थांची संख्या पाहता सदरची जागा अपुरी असल्याने मिरा भाईंदर महानगरपालिकेस आणखी सुमारे ५०० चौ.फूट जागा उपलब्ध करुन देणेबाबत दि.०४/१२/२०१४ रोजीच्या पत्रान्वये विनंती केलेली आहे.

मा. महासभा दि.१५/०१/२०१३, ठराव क्र.४१ अन्वये महानगरपालिकेच्या इतर मालमत्ता देखील संस्थांनी भाड्याने मागितल्यास भाडे ठरवून सदरच्या मालमत्ता भाड्याने देण्याचे अधिकार मा. स्थायी समिती सभेस देण्यात आलेले आहेत.

सबब उपनिबंधक, सहकारी संस्था, ठाणे तालुका यांना उक्त नमुद मा. महासभा ठरावाप्रमाणे १००० चौ.फुट जागा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे व त्यांनी मागणी केलेली वाढीव ५०० चौ. फूट जागा अशी एकूण १५०० चौ. फुट जागेकरीता महानगरपालिकेच्या रामनगर ॲमेनिटी हॉल, शांती गार्डन, मिरारोड (पूर्व) इमारतीमधील तळ मजल्यावरील जागा उपलब्ध करुन देणेस ही सभा मंजूरी देत आहे.

**जयंतीलाल पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजूर.

**प्रकरण क्र. १३७ :-**

उपनिबंधक, सहकारी संस्था यांना भाडयाने जागा उपलब्ध करुन देणेस मान्यता देणे.

**ठराव क्र. १३१ :-**

उपनिबंधक, सहकारी संस्था, ठाणे तालुका, ठाणे या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात मिरा-भाईंदर व नवी मुंबई महानगरपालिका येथील सहकारी गृहनिर्माण तसेच इतर सहकारी संस्थांचा समावेश होतो. सन मार्च २०१४ अखेर या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात एकूण ५,३०६ संस्था नोंदणीकृत झालेल्या आहेत. यापैकी बहुतांश संस्था या मिरा-भाईंदर महानगरपालिका या कार्यक्षेत्रात आहेत. मिरा-भाईंदर क्षेत्रात सध्या असलेले कार्यालय हे एकंदरीत कार्यक्षेत्राचा विचार करता मध्यवर्ती ठिकाणी आहे.

उपनिबंधक, सहकारी संस्था, ठाणे तालुका हे कार्यालय मिरा-भाईंदर हद्दीत स्थलांतरित करण्याकरीता व संस्थांचे कामकाज सुलभतेने व जलद गतीने होण्याकरीता उपनिबंधक, सहकारी संस्था, ठाणे तालुका, ठाणे यांनी पत्रान्वये कळविलेले होते. त्या अनुषंगाने दि.०१/१२/२०१२ मा. महासभा सूचना क्र.३ यानुसार तहकुब मा. महासभा शुक्रवार दि.१४/१२/२०१२, ठराव क्र.२१ अन्वये रामनगर ॲमिनिटी हॉल, मिरारोड (पूर्व) येथे १०००

चौ.फूट जागा उपनिबंधक (सहकारी संस्था) यांच्या कार्यालयास शासकीय दराने भाडे घेऊन जागा उपलब्ध करुन देण्यात यावी याबाबत ठराव पारित केलेला आहे.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मिरारोड (पूर्व), शांती गार्डन, रामनगर येथील महानगरपालिकेच्या ॲमिनिटी ओपन स्पेसच्या जागेत बांधलेल्या इमारतीमध्ये उपनिबंधक संस्था, ठाणे तालुका, ठाणे यांना कार्यालयासाठी १००० चौ.फूट जागा शासकीय दराने जागा उपलब्ध करुन देणेबाबत महानगरपालिकेने निर्णय घेतलेला असलेबाबत व जागेचे भाडे ठरविणे, करारनामा करणेच्या कार्यवाहीसाठी संपर्क करुन कार्यवाही करणेबाबत कळविण्यांत आलेले होते.

उपनिबंधक, सहकारी संस्था, ठाणे तालुका यांनी मिरा-भाईंदर शहरातील सहकारी संस्थांची संख्या पाहता सदरची जागा अपुरी असल्याने मिरा भाईंदर महानगरपालिकेस आणखी सुमारे ५०० चौ.फूट जागा उपलब्ध करुन देणेबाबत दि.०४/१२/२०१४ रोजीच्या पत्रान्वये विनंती केलेली आहे.

मा. महासभा दि.१५/०१/२०१३, ठराव क्र.४१ अन्वये महानगरपालिकेच्या इतर मालमत्ता देखील संस्थांनी भाड्याने मागितल्यास भाडे ठरवून सदरच्या मालमत्ता भाड्याने देण्याचे अधिकार मा. स्थायी समिती सभेस देण्यात आलेले आहेत.

सबब उपनिबंधक, सहकारी संस्था, ठाणे तालुका यांना उक्त नमुद मा. महासभा ठरावाप्रमाणे १००० चौ.फुट जागा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे व त्यांनी मागणी केलेली वाढीव ५०० चौ. फूट जागा अशी एकूण १५०० चौ. फुट जागेकरीता महानगरपालिकेच्या रामनगर ॲमेनिटी हॉल, शांती गार्डन, मिरारोड (पूर्व) इमारतीमधील तळ मजल्यावरील जागा उपलब्ध करुन देणेस ही सभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. मोहन जाधव अनुमोदक :- श्री. जयंतीलाल पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १३८ “के” प्रस्ताव - राई येथील जुने मार्केट इमारत तोडणेस मान्यता देणे.

**नयना वसानी :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात राई येथे ग्रामपंचायत काळापासून असलेली मार्केट इमारत धोकादायक अवस्थेत असून मोडकळीस आलेली आहे. सदर इमारत नव्याने बांधावयाची आहे. तत्पूर्वी सदर धोकादायक व मोडकळीस आलेली मार्केट इमारत कोसळून जिवित व इतर हानी होऊ नये यासाठी त्वरीत तोडणेस मान्यता देण्यात येत आहे.

**अश्विन कासोदरिया :-**

माझे अनुमोदन आहे.

**सुहास रकवी :-**

नरेश पाटीलनी मोरव्याचे पण सांगितले आहे तर तुम्ही सुचनेसह ठराव मंजूर करुन घ्या.

**नरेश पाटील :-**

मोरव्याचे पण टाका.

**मा. सभापती :-**

प्रशासनाने बघून निर्णय घ्यावा. ठराव सर्वानुमते मंजूर. खांबित साहेब ते बघून घ्या.

**दिपक खांबित :-**

बघून पुढच्या वेळेला विषय आणतो.

**नरेश पाटील :-**

विषय आणायची गरज नाही.

**दिपक खांबित :-**

त्याचं स्ट्रक्चरल ऑडीट झाले आहे. चांगले आहे वाईट आहे बघायला लागेल.

**मा. सभापती :-**

त्याचे म्हणणे स्ट्रक्चरल ऑडिट बघून निर्णय घ्यावा.

**राजेंद्र जैन :-**

पाच पॉईंट पे बोलने का है। १) टॅक्स डिपार्टमेंट में लोग जाते है उनका टॅक्स विथ इंटरेस्ट बढता जाता है। उनको जाने के बाद मालूम पडता है किधर भरने का है उसको पेन्सील से २१ हजार लिखके दिया जाता है। अभी वो ड्यूप्लीकेट मांगते उनको डाऊट है यह सही गलत है नहीं देता तो इंटरेस्ट लगातार लगता जा रहा है। अगली मिटींग में इसका स्पष्टीकरण दिजीए। २) इनलिगल हॉकर्स झोन जो है यह हमने महासभा में प्रस्ताव पास

किया था उसपर उचित कोई लॉजीक नहीं था की उसको नो झोन हॉकर्स बनाए या ना बनाए। हमने एक प्रस्ताव पास किया उसपे कुछ लॉजिक नहीं था। अभी लोग हॉकर्स के पिछे पडे हूए है। कानून का पालन करना चाहिए बरोबर है। लेकिन सुप्रिम कोर्ट का ऑर्डर आया है। तो इनलिगल हॉकर्स झोन पे धोरण बनाया जाए। नियम से काम किजिए। ३) अनधिकृत बांधकाम को तोड दिया गया है। तोडने के बाद उसका पिलर रखा है। क्यों रखा है। सुदामा बिल्डर्स मेरे वॉर्ड में है अभी तूटा सात साल के कारवाई के बाद तूटा। पर अभी पिलर रखा है। ४) ओसवाल बिल्डर्स का हायवे के उधर एक बिल्डींग तूटी पडी है। उस जगह को क्लियर करो। यह कबसे इश्यू पेंडींग पडे है। खांबित साहब का महासभा में सवाल था रिलायन्स का झोन बनाने का अभी जैसे एल.एडी लाईट आयी नगरसेवक को अपने निधी से मैं मेरे वॉर्ड में चाहू की मेरे वॉर्ड में स्ट्रिट लाईट एलएडी लग जाए ताकी बिजली की बचत हो तो कमसे कम प्रशासनने मंत्रालय में लिख के तो भेजे की नगरसेवक निधी के अंदर एल.एडी लाईट लगाने को प्रावधान किया जाए।

(सभागृहात गोंधळ)

**राजेंद्र जैन :-**

रिलायन्स का बिल एक महासभा में आया था। काकाणी साहबने बोला मैं बुलाता हूँ। मैं मिटींग करता हूँ, ३-४ बार यह विषय हो चूका है कभी पूरा नहीं हुआ। रिलायन्स का ॲग्रीमेंट अभी तक लोवेस्ट रेट से नहीं लगाया। कर्मशियल लग रहा है। खांबित साहब ने जानकारी दी है की बन भी गया है मैंने बहुत काम किया है पहले आप डिस्कशन किजिए फिर महासभा में पेश किजीए। परिवहन विभाग के अंदर दुनिया भरके ॲमेड लगे हुए है। मैं मॅडम से मिलने गया था १५ टक्के आना चाहिए अगर १ लाख इन्कम होती है कॅस्ट्रल कंपनी को तो १५ हजार मिलना चाहिए। हमारे पास कितना उत्पन्न है। उसका एन्ट्री आया नहीं उसके चेकींग का कूछ सिस्टम नहीं है। सबसे बडी बात एसपीएमएल वाकोडे साहब का इसका डेली इनवर्ड मेजरमेंट का रेकॉर्ड बोला था। अभी तक वो डेट आया नहीं । आपकी इनवर्ड नोंदणी डेली बेसीसपे नहीं होती। इसमे भयंकर गोलमाल है।

**सुहास रकवी :-**

मा. सभापती महोदय एक रिक्वेस्ट आहे. सिमा मिश्रा मॅडम ह्याचे आपण एक पत्र टाकलेले.

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु.)) :-**

ह्याच्यावर माहिती देतो ना.

**सुहास रकवी :-**

सिमा मिश्रा मॅडम इथे बसल्या आहेत.

**मा. सभापती :-**

त्यांचे डेझीग्नेशन.

**नयना वसानी :-**

गेल्या सभेत हा मुद्दा विचारला होता.

**मा. सभापती :-**

प्रशासनानी त्याचे उत्तर द्यावे.

(सभागृहात गोंधळ)

**मा. सभापती :-**

तुम्ही त्याच्यावर निर्णय करायचा आहे. आपल्याकडे वसूली होत नाही तर तो विषय नाही. हॉकर्सचा विषय खूप गहन विषय आहे. हॉकर्सला काढायचे म्हणजे तर मार्केट गरजेचे आहे.

**सुहास रकवी :-**

मा. सभापती साहेब आम्ही काल त्याच्यावर डिस्कशन केले. त्याची सगळी योजना चालू आहे. सुप्रिम कोर्टाचे डिरेक्शन आहेत. २६ पानाचे सुप्रिम कोर्टाने ऑर्डर पारीत केलेली आहे. त्यामध्ये हॉकर्समध्ये कोणाला द्यायचे ना फेरिवाला झोन, फेरीवाला झोन ते तयार करतात ही वैयक्तिक माहिती पण आपले जे डेझीग्नेशनवाले इकडे बसले आहेत ना.

**मा. सभापती :-**

हा विषय पटकन सांगण्यासारखा नाही. सविस्तर सांगणार आहेत हा विषय पुढच्या सभेस आम्हाला सांगा. हा विषय पुढच्या सभेस घ्यायचे ठरवले. रकवी साहेबांच्या प्रश्नाचे उत्तर अपेक्षित आहे.

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु.)) :-**

सिमा मिश्रा मॅडम इथे सिस्टिम मॅनेजर म्हणून उपस्थित आहेत.

**सुहास रकवी :-**

आपण महासभेमध्ये ठराव केलेला आहे. त्याच्यावर झालेले आरोप त्यामुळे त्यांना निलंबित केले होते. काय म्हणून करतात आयुक्तांनी घ्यायचे नाही आहे. असा ठराव पूर्ण महासभेने केलेला आहे.

**मा. सभापती :-**

ह्याचा अर्थ महासभेचा अवमान केलेला आहे.

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु.)) :-**

सभापती महोदय, महासभेचा अवमान केलेला नाही किंवा करण्याचा हेतू नाही. सिमा मिश्रा ह्यांचा प्रस्ताव महासभेसमोर रितसर सादर झाला होता. एखादा कर्मचारी किंवा अधिकाऱ्यावर शिस्तभंगाची कारवाई सुरु झाली तर त्याची पध्दत आहे की त्याला जोडपत्र द्यायचे ज्ञापन द्यायचे त्याचे म्हणणे ऐकून घ्यायचे. चौकशी अधिकारी नेमायचा चौकशी अधिकाऱ्यांनी त्याच्या साक्षी नोंदवायच्या त्यानंतर त्या आपचारी कर्मचाऱ्यांना वाटले की आपणही चार साक्षी नोंदवायच्या त्यांनी सुध्दा त्या साक्षी मागायच्या त्या साक्षी नोंदवायच्या अशाप्रकारे दोन्ही बाजूंनी चौकशीचे काम पूर्ण झाल्यानंतर त्याचा एक ऑबस्टॅक तयार होतो की दिलेले आरोप आणित्याची सिध्दता हा सर्व गोषवारा मा. महासभेसमोर ह्यापूर्वी सादर झालेला आहे. महासभेने त्यावर निर्णय घेतला की सिमा मिश्रा ह्याची एक वेतनवाढ रोखवून त्यांना पूर्ववत कामावर घेण्यात यावे. हे पहिल्या ओळीला आहे की एक वेतनवाढ रोखून दुसऱ्या ओळीला आहे. त्यांना पूर्ववत कामावर घ्या त्याच्या खालीच आहे घेतल्यावर त्यांना त्या पदावर देण्यात येऊ नये. प्रश्न असा आहे की ज्यावेळेला महासभेसमोर गोषवारा गेला त्यावेळी त्याची रितसर चौकशी पूर्ण करुन तो विषय गेला आणि विषय गेल्यानंतर त्याच्यात संपूर्ण वस्तुस्थिती सादर केलेली आहे. महासभेने त्यावर निर्णय घेतलेला आहे की शिक्षा द्या एक वेतनवाढ रोखा म्हणजे ती शास्ती तिथे पूर्ण झालेली आहे. आता एकाच गुन्ह्यासाठी एक शास्ती महासभेने दिल्यानंतर खालच्या ओळीला आपण म्हणता त्यांना रिइस्टेट करा आणि तिसऱ्या ओळीवर म्हणतो त्यांना देऊ नका. हे जर पद समकक्ष किंवा समतूल्य असत की हे डेप्यूटी इंजिनिअर आहेत कुठे तरी सस्पेंड झाला रिइस्टेट केला त्यांना दुसरीकडे द्याव तर मग त्याला आपण पाण्याचा पी.डब्ल्यू.डी. चा इलेक्ट्रीकल असे करता आले असते जर इलेक्ट्रीकल इंजिनिअर हा शब्द नसता तर सिस्टिम मॅनेजर स्पेसिफिकली कम्प्यूटर सिस्टमसाठी डिझाइन झालेला आहे हे पद महापालिकेत दुसर कुठेही नाही आणि त्यांना देण्यासारख दुसर काम नाही त्यामुळे त्यांना त्याच पदावर देण्याव्यतिरिक्त पर्याय नाही. त्यामुळे त्यांना आपण सिस्टिम मॅनेजर म्हणून रिइस्टेट केलेल आहे की जो महासभेचाच निर्णय आहे महासभेनेच निर्णय घेतला की एक वेतनवाढ रोखा शास्ती सुध्दा पूर्ण झालेली आहे.

**मा. सभापती :-**

ह्याचा खुलासा करा की कोर्टाने निर्णय दिलेला आहे की, एखाद्या व्यक्तिला संबंधीत जागेवरुन दोषी ठरवले किंवा दोषामध्ये आढळले सुटका झाल्यानंतरची गोष्ट वेगळी आहे पण आढळल्यास जोपर्यंत आरोप सिध्द होत नाही तोपर्यंत त्या पदावर पुनःश्च घेण्यात येऊ नये असा कोर्टाचा निर्णय आहे ह्याबाबत विधी मॅडमनी खुलासा करावा.

**विधी अधिकारी :-**

मा. सभापतींच्या परवानगीने बोलते की, तुमचा प्रश्न असा आहे की, कोर्टाने दिलेला निर्णय की आरोप सिध्दीपर्यंत त्यांना त्या पदावरती घेऊ नये असे तुमचे म्हणणे आहे. जोपर्यंत आरोप सिध्द होत नाही तोपर्यंत घेता येणार नाही. आरोप सिध्द होईपर्यंत.

**मा. सभापती :-**

त्या पदावरुन त्यांना निलंबित केले किंवा ॲन्टी करप्शन झाले किंवा कोणत्याही गोष्टीमध्ये त्यांना दोषी ठरवले. एखाद्या व्यक्तिला की तुम्ही ह्या कामामध्ये तुम्ही बरोबर बसत नाही तुम्ही हे करता हे चूकीचे आहे. तुम्हाला इकडून मी निलंबित करतो किंवा तुमच्यावर कोणती कारवाई केली तुम्ही त्याच्यापुढे जाऊन कारवाई केली त्याच्या नंतर पुढे जाऊन प्रक्रिया करुन मी त्याच्यामध्ये नाही किंवा दोषी नाही असे सर्व सिध्द करुन द्याला पण तोपर्यंत आम्ही सर्वांनी निर्णय घेतला की, तुम्हाला इथे ठेवायचे नाही तर त्याच्यानंतर पुन्हा त्या जागेवर असा एलसीबी ॲक्ट आहे. त्याच पदावर तुम्हाला पुनःश्च ठेवता येत नाही जर तुम्ही दोषमुक्त झालात तर तुम्ही त्या पदावर येऊ शकता ना. पण दोष सिध्द होत नाही तोपर्यंत त्या पदाचा कार्यभार सांभाळू शकत नाही.

**विधी अधिकारी :-**

एल.सी.बी. ॲक्टचा फुलफॉम कळला तर मला बरे होईल.

**मा. सभापती :-**

ॲन्टी करप्शन ॲक्टमध्ये आहे. तुम्ही तो वाचा त्याच्यामध्ये लिहिलेल आहे. जोपर्यंत दोषमुक्त होत नाही पुन्हा त्या पदावर तुम्ही येत नाही.

**विधी अधिकारी :-**

ॲन्टी करप्शन टोटली वेगळी केस आहे.

**सुहास रकवी :-**

त्या आता तेच म्हणाल्या जोपर्यंत दोषारोप सिध्द होईपर्यंत त्या पदावर घ्यायचे नाही हा निर्णय झाला मग त्या पदावर पुन्हा का घेण्यात आल.

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु)) :-**

मा. सभापती महोदय तुमचे आणि मॅडमचे म्हणणे बरोबर आहे मी काही वेगळ सांगितले नाही. आरोप सिध्द झाल्यानंतर दोषारोप पत्र जे दिलेले असते ते समरीली आपण महासभेसमोर सादर केले. महासभेने निर्णय केला त्यांना शास्ती दिली एक वेतनवाढ रोखा आणि ते प्रकरण क्लोज झाल. आपण जे बोलता ते शास्तीच्या पूर्वीचे आहे की चौकशीच्या अधीन राहून कुठलाही निर्णय न होता त्या पदावर नेमू नये तो विषय त्यावेळेस ........

**मा. सभापती :-**

शास्ती महासभेच्या विषयामध्ये त्या ठरावामध्ये तसे नमूद करण्यात आले होते. शास्ती दिल्यावर त्या पदावर ठेवाव. शास्ती घेण्यात यावी पदावर काढण्याचा हा मुद्दा त्याच्यात आलाच नसता.

**प्रभात पाटील :-**

शास्ती मला वाटते त्याच्यावर जो चौकशी आयोग नेमला होता त्यांनीच त्यांना शास्ती लावली.

**मा. सभापती :-**

शास्तीचा विषय वेगळाच आहे.

**प्रभात पाटील :-**

महासभेने शास्ती लावली नाही.

**मा. सभापती :-**

तीन मुद्दे जर महासभेत मांडले आहेत तर तिन्हीला बाधील राहणे गरजेचे आहे. एक तर त्याची एक महिन्याची मुदतवाढ रोखण्यात यावी दुसरी त्यांना त्या पदावर ठेवण्यात येऊ नये आणि तिसरी असे तीन जे मुद्दे आहेत ते मुद्दे कायमच राहतात शास्ती दिल्यावर तो मुद्दा कमी होतो किंवा त्याच्यावर पावर कमी होते असे काही दिसत नाही जर तुम्हाला त्या पदावर आणायचे आहे तर रितसर महासभेपूढे विषय मांडा. आज त्या पदावर घेतले म्हणजे तुम्ही मा. महासभेचा अवमानच केला. मा. सदस्याचा तसेच ज्यांनी त्याला सुचक अनुमोदन बहुमत दिले आहे त्या सदस्याचा अवमान झाला.

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु)) :-**

मा. सभापती महोदय आपण ह्यांना म्हणतो घ्याव पण इथे देऊ नये पण आपल्याकडे पदच नाही.

**मा. सभापती :-**

एवढे महिने कार्यभार चालतो ना. ते पद रिकामी असताना ती खूर्ची सही करते की खुर्ची निर्णय घेते.

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु)) :-**

तो आपण कोणाला तरी चार्ज देतो.

**मा. सभापती :-**

कोणाला देतो मग तो तसाच कन्टीन्ह्यू राहावे. ह्यांची ॲबसेन्टी किती महिने आहे.

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु)) :-**

त्यांना निलंबित केल्यानंतर जोपर्यंत रिइस्टेट करत नाही तोपर्यंत गैरहजर नाही होत ना.

(सभागृहात गोंधळ)

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु)) :-**

ते पद एकच असेल आणि सॅक्शन पद दुसर नसेल तर त्या पदावर घेण्यावाचून पर्याय नाही.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

त्या रजेवर होत्या त्या पदावर दुसर कोणी बसत असेल ना.

**मा. सभापती :-**

रजेचा कालावधी किती होता समजेल का?

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु)) :-**

डिटेल माहिती घेऊन सांगतो.

(सभागृहात गोंधळ)

**प्रभात पाटील :-**

त्या सांगतील ना.

**नयना वसानी :-**

त्या निलंबीत होत्या तेव्हा कोणीतरी सांभाळले ना.

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु)) :-**

मला मान्य आहे कोणीतरी सांभाळले त्याच्या ॲबसेन्टीमध्ये आपण चार्ज देतो ही ऑफिसची पध्दत आहे. पण ओरिजनल माणूस कामावर रुजू झाल्यानंतर .................

(सभागृहात गोंधळ)

**मा. सभापती :-**

महासभेची परवानगी घेणे गरजेचे नाही का?

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु)) :-**

महासभेने निर्णयनंतर ......................

**मा. सभापती :-**

महासभेने कुठे निर्णय दिला की, त्यांना त्याच जागेवर घ्या म्हणून.

(सभागृहात गोंधळ)

**प्रभात पाटील :-**

आता असे झाले आहे की, ह्याच्यापूढे महासभेने निर्णय घ्यायचे नाहीत ...........

**नयना वसानी :-**

महासभेच्या निर्णयात फेरबदल करण्याचा अधिकार मा. आयुक्तांना कधीपासून आहे.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्यांनी हे समजून घ्या की, प्रशासन आपल्यावर निर्णय लादतील ते आपण मान्य करायचे. तुम्ही सांगा त्या विषयामध्ये त्या ठरावामध्ये स्पेसिफिक तीन मुद्दे वेगळे होते तीन्ही मुद्दयांमधल्या कुठच्याही मुद्दयाला सॉफ्ट कॉर्नर मला दिसतच नव्हत. त्यांचे एक महिन्याचे वेतनवाढ थांबवण्यात यावी त्यांना त्या पदावर घेण्यात येऊ नये. तुम्ही सांगितलेला तिसरा मुद्दा असे तिन्ही मुद्दे तसेच्या तसे आहेत. वेतनवाढ रोखल्यास त्याच्यामधून सूट द्यावी किंवा ते घेतल्यास ह्याच्यामधून सूट द्यावी असे कुठेच सांगितले नाही. जर तुम्हाला त्या पदावर पुनःश्च घ्यायचे आहे तर रितसर महासभेपूढे विषय मांडा तोपर्यंत चालू आहे ना. जो कोणी ते पद सांभाळते तो आहे ना आणखी १५ दिवस सांभाळेल.

**नयना वसानी :-**

तो माणूस कॅपेबल होता म्हणून त्याला पदभार दिला ना.

**प्रभात पाटील :-**

९५ नगरसेवकांपेक्षा गणेश देशमुख ह्यांचा निर्णय योग्य आहे असा ह्याचा अर्थ झाला.

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु)) :-**

हा वैयक्तिक विषय झाला.

(सभागृहात गोंधळ)

**नयना वसानी :-**

महासभेच्या निर्णयात फेरबदल करण्याचा अधिकार कोणाला?

**मा. सभापती :-**

व्यक्तिगत आरोप करण्यासारखे नाही. आम्हाला पूर्ण स्पष्टीकरण की ह्यांनी ह्या पदावर घेण्याचा निर्णय कोणाचा ह्याचे आम्हाला स्पष्टीकरण लागेल. कोणी निर्णय घेतला कोणी सह्या केल्या आणि कोणी त्या पदावर बसवले हे आम्हाला लागेल कारण शेवटी काही झाले तरी मा. महासभेचा अवमानच झालेला आहे असे मी मान्य करतो.

**सुहास रकवी :-**

घ्यायचे असल्यास तो रितसर विषय घ्या. तो विषय महासभेत आणा.

**मा. सभापती :-**

मी त्या दिवशी पण सांगितले की प्रशासनाने सगळ्या गोष्टी आपल्या बाजूने करु नका. सर्वांना विश्वासात घेऊन करा.

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु)) :-**

मी खुलासा करतो.

**मा. सभापती :-**

साहेब खुलासा करण्यासारखी गोष्ट नाही.

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु)) :-**

निलंबन समितीने तो निर्णय घेतलेला आहे.

**मा. सभापती :-**

खुलासा करण्यासारखी गोष्ट नाही शेवटी काही झालेना तरी तुम्हाला मंजूरी घेणे गरजेचे आहे ना.

**सुहास रकवी :-**

आम्ही मा. आयुक्तांना काही पत्रव्यवहार करतो. स्मरणपत्र दिले तर साहेब तुम्ही ते बघा. तो विषय आणा अशी आमची तुम्हाला विनंती आहे.

**नयना वसानी :-**

मा. सभापती महोदय आमचा एक विषय आहे की, आपण प्रशासनातर्फे ..............

**मा. सभापती :-**

पहिले जे डॉ. साहेबांनी सांबितले आहे त्याचे निवारण करण्यात यावे. त्यांना हवी असलेली माहिती लेखी पूरवण्यात यावी. त्यांना दिलेली माहिती सन्मा. सदस्यांच्या पूढे मांडण्यात यावी म्हणजे त्यांना देखील कळेल की त्याचे काय निरसन करण्यात आले आहे. रकवी साहेबांनी ज्याप्रमाणे सांगितले त्याप्रमाणे त्याच्यावर करण्यात आलेला निलंबन कारवाईला कोणत्या अधिकाऱ्यांनी आणि कोणी प्रोत्साहन दिले आणि त्यांना त्या पदावर लावल कोणी महासभेचा अवमान केला याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा.

**नयना वसानी :-**

आपण प्रशासनातर्फे अपंग व्यक्ति वैगेरे असतील त्यांना आपण दूध केंद्र किंवा कॅबीन देतो पण ते कॅबीन असे झालेले आहे की, ज्यांना आपण देतो ते वापरतच नाही ते भाड्यावर देऊन ते दुसऱ्या कामाला असतात त्यामुळे जे गरजू असतात त्यांना ते कॅबीन देत नाही आणि विक्रम कुमार मा. आयुक्त असताना त्यांनी ह्यचे ऑब्झरवेशन केलेले होते आणि काही लोकांचे कॅबीन रद्द केलेले होते. पण आजही सुरळीत चालू आहे. भाड्याने

कॅबीन चालवल्या जातात आणि अपंग, गरजू लोकांना आपण कोणताही रोजगार देऊ शकत नाही ह्याच्यावर आपण त्वरीत कारवाई करावी.

**अश्विन कासोदरिया :-**

मैंने दो सालसे लेटर दिया था। मेरे प्रभाग में ५-६ स्टॉल ऐसे है जिसको विक्रम कुमारने कॅन्सल किया था। अबभी वो स्टॉल भाडे पे चल रहा है। तो मैंने आपको पत्र दिया आपने कारवाई नहीं की।

**नयना वसानी :-**

सेक्टर ७ में रोड के उपर जो केबीन था उसको बिल्डरने आरक्षित जगह में डाल दिया उसपे मनपाने कूछ कारवाई नहीं किया।

**दिपक कुरळेकर (मा. उपायुक्त) :-**

मा. सभापतींच्या परवानगीने बोलतो, तत्कालीन आयुक्त विक्रम कुमारनी ७० स्टॉलवर कारवाई करायला सांगितली होती. त्या स्टॉलवर परवाना विभागाने कारवाई केली आणि परवानग्या रद्द केल्या आहेत. त्या परवानग्याच्या अनुषंगाने सदरचे स्टॉल हटवण्याबाबत त्याच वेळेस पत्रव्यवहार केला तसा त्या प्रभागाचा अहवाल प्राप्त झालेला आहे स्टॉल हटवण्यात आलेले आहेत.

**अश्विन कासोदरिया :-**

मेरे प्रभाग में कौनसा स्टॉल हटाया।

**नयना वसानी :-**

बिल्डरने उठाके डाल दिया बिल्डर को अधिकार किसने दिया।

**मा. सभापती :-**

मॅडम तुम्ही अश्विनजी दोघांनी सांगितल्याप्रमाणे त्याची रद्द झालेली ऑर्डर आणि स्टॉल जागेवर असल्याचे फोटो हे माझ्याकडे घेऊन यावेत. पुढील कारवाई काय करायची आहे या संदर्भात आपण तयार रहा की आपण उत्तर दिलेले आहे कारवाई केलेली आहे.

**दिपक कुरळेकर (मा. उपायुक्त) :-**

कारवाई मी केलेली नाही. प्रभाग क्षेत्रिय अधिकारी करतात.

(सभागृहात गोंधळ)

**नयना वसानी :-**

त्याच्याकडून जाब विचारण्याचे काम कोणाचे आहे.

**मा. सभापती :-**

तुम्ही त्या पदावर आहात मग जबाबदारी कोणाची? मग तुम्ही बोलले कारवाई त्यांनी केली. आता बोलता कारवाई केलेली आहे. ह्याच्यानंतर प्रभाग समितीने केलेल्या कारवाईचा लेखी अहवाल येणे आपल्याकडे आहे ना.

**दिपक कुरळेकर (मा. उपायुक्त) :-**

आहे.

**मा. सभापती :-**

मग कशाला घाबरता त्यांचे फोटो येऊ दे. तुम्ही त्याच्यात प्रूफ करुन द्या.

**दिपक कुरळेकर (मा. उपायुक्त) :-**

प्रभाग अधिकाऱ्यांनी फोटो काढले आहेत का ह्याची कल्पना नाही पण कारवाई केली................

**सुहास रकवी :-**

कुरळेकर साहेब त्यांचे म्हणणे तेच आहे तुम्ही जेव्हा एच.ओ.डी. असाल तर त्याच्याकडून अहवाल तुम्ही मागवायचा.

(सभागृहात गोंधळ)

**नयना वसानी :-**

तो अहवाल कितपर्यंत खरा आहे त्याची तुम्ही तपासणी केली का? तुम्ही व्हिजीट केली का?

**सुहास रकवी :-**

कुरळेकर साहेब तुमच्या हाताखाली जे अधिकारी असतात ते तुमच ऐकतात ना. कधीकधी तुमची तक्रार असते आमच ऐकत नाही.

**मा. सभापती :-**

काल परवाचीच गोष्ट आहे आपण अनधिकृत बांधकाम आणि अनधिकृत टपऱ्या ह्याच्यावर कारवाई करतो की नाही हे कसे सिध्द होते. आता हे बोलले आमच्याकडे फोटो आहेत आम्ही बघितले आम्ही केल. मिरारोडला एक घटना घडली जिथे वाचनालय होत बाजूच्या दुकानवाल्यांनी शेडचे पत्रे लावलेले. वाचनालय कोणत्यातरी पक्षाचे होते त्याच्यावर इलेक्शन आचारसंहिता असल्यामुळे बोर्ड लावलेला वाचनालय हा शब्द दिसत होता तिथे गेले असता बाजूवाल्यांवर कारवाई करुन वाचनालय पण तोडून टाकले. एवढे उत्कृष्ठ दर्जाचे काम करते. एक सोसायटी आहे आईस फॅक्टरीच्या इथे ती जागा मनपाला हॅन्ड ओव्हर झाली. मागे बिल्डींग आहे त्याला २-३ एन्ट्र्या होत्या त्या लोकांनी विचार केला असेल तोडून भिंत बांधू द्या. त्या लोकांनी भिंत बांधली बाजूला असलेल्या इमारतीला लागून सेम पॅरलल भिंत बांधली मनपानी तिकडे जाऊन तोडायची कारवाई केली. तुमची भिंत एक फुट

आतमध्ये होती तुम्ही बाहेर का बांधली. तोडताना त्यांना कळवा सोसायटीचे काय नुकसान होणार आहे, तिकडे व्यसनी गर्दुले तिकडे बसतात. त्याच बिल्डींगमध्ये तशीच एक घटना घडलेली आहे तिकडे एक विकृत माणसाने जाऊन एका मुलीचे कपडे काढण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांनी कुंपणभिंत बांधली तर त्याच्याकडून स्पष्टीकरण घ्या. त्यांनी कोणत्या व्यवसायासाठी भिंत बांधली होती का? कारवाई करताना दुजाभाव केला जातो.

(सभागृहात गोंधळ)

**मा. सभापती :-**

वॉर्ड ऑफिसर उपस्थित आहे का?

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु)) :-**

राणे निवडणूकीमध्ये आहेत. दोन वॉर्डचा चार्ज शिरवळकरकडे आहे. एक बोरसे आहेत दोन वॉर्ड ऑफिसरला पूढच्या मिटींगमध्ये उपस्थित राहायला सांगतो.

**मा. सभापती :-**

आता कुरळेकरानी सांगितले वॉर्ड ऑफिसर उपस्थित असते तर आताच्या आता निवारण झाले असते.

(सभागृहात गोंधळ)

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु)) :-**

कुरळेकर साहेबांच्या वतीने मी दिलगीरी व्यक्त करतो.

**राजेंद्र जैन :-**

वॉर्ड ऑफिसर छुट्टी का लिखीत रुप में चाहिए।

**मा. सभापती :-**

टॅक्स डिपार्टमेंटच्या मॅडमना एक विषय सांगितलेला. एका सोसायटीचा नऊ लाख टॅक्स बाकी आहे. त्या सोसायटीला जनरल बिल पाठवले आहे. बिल्डरच्या नावाने संपूर्ण सोसायटीला तर त्या लोकांनी रितसर ॲप्लीकेशन केले तर ती लोक नऊ लाख भरायला तयार आहेत. आपली परिस्थिती अशी आहे ते ९ लाख घ्यायचे ते कशाच्या आधारावर घ्यायचे आपल्याकडे घ्यायला माणस नाहीत. त्या संदर्भात त्या मॅडमना विचारले तर मॅडमनी सांगितले आम्ही माणसांसाठी मा. आयुक्तांकडे शिफारस केली आहे. गरजेच्या वस्तूला जर आम्हाला शिफारस करायला लागत असेल तर मग प्रशासन करणार काय? वसूली करायची आहे माणस नाहीत. तोडक कारवाई असेल ठिक आहे तिथे नाही पण तिथे माणस उपलब्ध होतात पण जिथे गरज आहे तिथे उपलब्धच होत नाही.

**हंसुकुमार पांडे :-**

मा. सभापती साहेब गए स्टॅंडिंग में मैं आपने रस्ते का रोड टॅक्स लगाया इतना ओपन लॅन्ड टॅक्स बाकी है। तो क्यों नही वसूल किया जाता। आप १० टक्का टॅक्स लगाते हो जहाँ से रेव्हेन्यू आता है वह कलेक्ट नहीं करते। ओपन लॅन्ड टॅक्स ८० करोड बाकी है। तो क्यों नही वसूल किया जा रहा है। मेरे प्रभाग में इतने ओपन लॅन्ड है। जिसमें सब डेकोरेटिव्ह काम चल रहा है। ओसवाल गार्डन है, उमेश डेकोरेटर है राज डेकोरेटर है..................

**मा. सभापती :-**

आपण इथे आता प्राधिकृत म्हणून आहात मी आपणास सांगतो की पूढच्या सभेमध्ये मला ओपन लॅन्ड टॅक्ससाठी एवढी माणस, कर वसूलीसाठी एवढी माणसे अशी नमूद झाल्याची यादी मला पूढच्या सभेस देण्यात यावी.

**हंसुकुमार पांडे :-**

वसूली किती झाले ते बघाना.

**मा. सभापती :-**

माणस तरी येऊ दे मग आपण कारवाईला लावू.

**हंसुकुमार पांडे :-**

ओपन लॅन्ड में जो भाडा लिया जाता है, बर्थ डे बनाया जाता है, शादी मनाई जाती है वह ओपन लॅन्ड में टॅक्स लेते हो की नहीं और लेते हो तो कौनसे रेट से लेते हो।

**मा. सभापती :-**

पुढच्या सभेला विषय सादर करा.

**सुहास रकवी :-**

ओपन लॅन्ड टॅक्समध्ये त्याच्या ज्या ॲक्टीव्हीटी चालतात त्याचे ते रिकलेक्शन पे करतात त्याचा आपल्या मनपाला उत्पन्नाचा स्त्रोत म्हणून हा विषय घ्या.

**हंसुकुमार पांडे :-**

ओसवाल बगीचा बनवला त्याच्याकडे कोणती परमिशन आहे.

**मा. सभापती :-**

हा उत्पन्नाचा सोर्स आहे. हा विषय घेण्यात यावा.

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु)) :-**

मी आधीच बोललो टॅक्सची माहिती देऊ का? आपण बोलतात पुढच्या मिटींगला.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजूर.

**प्रकरण क्र. १३८ :-**

“के” प्रस्ताव - राई येथील जुने मार्केट इमारत तोडणेस मान्यता देणे.

**ठराव क्र. १३२ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात राई येथे ग्रामपंचायत काळापासून असलेली मार्केट इमारत धोकादायक अवस्थेत असून मोडकळीस आलेली आहे. सदर इमारत नव्याने बांधावयाची आहे. तत्पूर्वी सदर धोकादायक व मोडकळीस आलेली मार्केट इमारत कोसळून जिवित व इतर हानी होऊ नये यासाठी त्वरीत तोडणेस मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- डॉ. नयना वसाणी  अनुमोदक :- श्री. अश्विन कासोदरीया**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

आजची मिटींग संपली असे मी जाहिर करतो.

**(सभा संपल्याची वेळ दु. २.२५वा.)**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

